सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, ०२ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २७९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# सरकारकडून वीजबील थकवलेल्यांना पुन्हा अभय

## घरगुती-व्यवसायिक ग्राहकांना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

मुंबई : बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना २०२४ ला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले. राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्या नंतर ३१ डिसेंबर पर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्ष्यात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र ३१ मार्च २०२५ नंतर या योजनेला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला असुन थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यातील ९३८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून १३० कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रँचायझी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल पवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीजग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.

# शेतकऱ्यांना डीएपी- खतावर विशेष अनुदान पॅकेज

## केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला निर्णय

नवी दिल्ली, ०१ जानेवारी : शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किमतीत डीएपी खताची शाश्वत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आज, बुधवारी 'एनबीएस' अनुदानाव्यतिरिक्त डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) साठी पुढील आदेश येईपर्यंत विशेष पॅकेज दिले जाणार आहे. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला.

एनबीएस अनुदानाव्यतिरिक्त हे पॅकेज असणार आहे. या निर्णयामुळे शेतकरी बांधवांना १ जानेवारी २०२५ पासून पुढील आदेश येईपर्यंत परवडणाऱ्या किंमतीत डीएपीची शाश्वत उपलब्धता सुनिश्चित होईल. या कालावधीसाठी ३,५०० रुपये प्रति मेट्रिक टन दराने डीएपी खत पुरवठा करण्याच्या खत विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांना अनुदानित, परवडणाऱ्या आणि वाजवी दरात डीएपी खताची उपलब्धता सुनिश्चित केली जाईल. खत उत्पादक किंवा आयातदारांमार्फत २८ ग्रेड पी अँड के खत शेतकऱ्यांना अनुदानित किंमतीत उपलब्ध करून दिले जातात. पी अँड के खतांवरील अनुदान १ एप्रिल २०१० पासून एनबीएस योजनेद्वारे नियंत्रित केले जाते. शेतकऱ्यांच्या हितावर लक्ष केंद्रित करणे, यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्राधान्य देत आहे. सरकारने डी-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) खताची किंमत अपरिवर्तित ठेवून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. भौगोलिक-राजकीय मर्यादा आणि जागतिक बाजारपेठेत अस्थिरता असतानाही, सरकारने खरीप आणि रब्बी २०२४-२५ साठी शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किमतीत डीएपी उपलब्ध करून देऊन शेतकरी बांधवांच्या बाबतीत अनुकूल दृष्टिकोनासाठी आपली वचनबद्धता कायम ठेवली. जुलै, २०२४ मध्ये मंत्रिमंडळाने १ एप्रिल ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत एबीएस अनुदाना व्यतिरिक्त डीएपीवर एका वेळेसाठी विशेष पॅकेज दिले आहे. यानुसार ३,५०० रुपये प्रति मेट्रिक टन दर मंजूरी दिली होती; त्यानुसार २,६२५ कोटी रुपयांच्या अंदाजे खर्च शेतकरी बांधवांसाठी केला जाणार आहे.

# देशातील टॉप दोनच्या माओवादी कमांडरच्या पत्नीसह ११ माओवाद्यांची शरणागती

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण



गडचिरोली : राज्यातील माओवादी संघटनेला मोठा हादरा बसला आहे. देशातील क्रमांक दोनच्या माओवादी कमांडरच्या पत्नीने आज पोलिसांसमोर शरणागती पत्करली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज गडचिरोली पोलीस मुख्यालयात टॉप माओवादी कमांडरने आत्मसमर्पण केलं आहे. विशेष बाब म्हणजे आज आत्मसमर्पण करणाऱ्या माओवादी कमांडर असल्याने माओवाद्यांची चळवळ अधिक खिळखिळी झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोलीत सी-६० जवानांचा सत्कार सोहळा आणि माओवाद्यांचा आत्मसमर्पणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मला या गोष्टीचा आनंद आहे की माझ्या नववर्षाची सुरुवात आणि संपूर्ण दिवस गडचिरोलीत उपस्थित आहे. गडचिरोलीच्या सी-६० च्या अधिकारी आणि जवानांसोबत घालवता आला. अनेक कार्यक्रम पार पाडता आले. अहेरी ते गरदेवाडा बस स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा धावत आहे. त्या बसचं उद्घाटन आपण केलं. पेनगुंडाला नवीन आऊटपोस्ट सुरु केलं. कोनसरीमध्ये विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन केलं, यामुळं गडचिरोलीला स्टील सिटीचा दर्जा मिळणार आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. तर येत्या काळात महाराष्ट्रातून माओवाद हद्दपार झालेला असेल, असा विश्वासही फडणवीस यांनी बोलून दाखवला आहे.

कोटींच्या रकमेचे बक्षीस असलेले माओवाद्यांचं आत्मसमर्पण

तारक्का उर्फ तारा उर्फ वत्सला उर्फ विमला सिडाम ही आत्मसमर्पण करत आहे. तारक्का स्वतः दक्षिण गडचिरोली मधली मोठी माओवादी कमांडर तर आहेच, सोबतच ती माओवाद्यांच्या देशभरातील फळीमधील विद्यमान नंबर दोन आणि सेंट्रल कमिटी तसेच पोलित ब्युरो मेंबर (माओवाद्यांची सर्वात मोठी निर्णय करणारी यंत्रणा) भूपती उर्फ सोनू उर्फ मल्लोजूला वेणुगोपाल याची पत्नी आहे. म्हणजेच माओवाद्यांच्या रेंटिंग मध्ये देशभरात जो नंबर दोनवरचा माओवादी कमांडर आहे, त्याची ती पत्नी आहे.

# ज्या दिवशी आरक्षण मिळेल, त्यादिवशीच आमचं खरं नवीन वर्ष; मनोज जरांगेंकडून सरकारविरुद्ध संताप

नांदेड : जिल्ह्यातील माळेगाव येथील खंडोबारायाचे मनोज जरांगे पाटील यांनी आज दर्शन घेतले. यावेळी पूजाअर्चना करून पाटील यांनी खंडोबाचे दर्शन घेतले. गोरगरीब मराठ्यांवर अन्याय होतोय. त्यांना आरक्षण मिळू दे, शेतकरी अडचणीत आहे त्यांना बळ मिळावं, सरकारने शेतकर्यांना मदत करावी, असा आशीर्वाद आपण खंडोबाकडे मागितल्याचे जरांगे पाटील म्हणाले. तसेच ज्या दिवशी आरक्षण मिळेल त्या दिवशी आमचं खर नवीन वर्ष असे म्हणत मनोज जरांगेंकडून सरकारविरुद्ध परत एकदा संताप व्यक्त केला आहे.

नवीन वर्ष आम्हाला आहे की नाही असं वाटतंय. सुख आमच्या वाट्याला नाही. आरक्षण नसल्यामुळे गरिबांच्या लेकराचं आयुष्य बरबाद होत आहे. नवीन वर्ष येतात जातात, पण आम्हाला न्याय कधी मिळेल याची अपेक्षा आहे. खरं नवीन वर्ष ज्या दिवशी





आरक्षण मिळेल त्या दिवशी असेल. असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगे काय म्हणाले?

देवेंद्र फडणवीस म्हणत होते मी कोणाला अडसर नाही. , एकनाथ शिंदे साहेबांना विचारा मी अडसर आहे का मराठा आरक्षणाबाबत . आता लक्षात येईल तेच आहेत मुख्यमंत्री , २५ तारखेपर्यंत मराठा आरक्षणाचा विषय मार्गी काढतेत की नाही, ते स्पष्ट होईल. आमरण उपोषण २५ जानेवारीला फायनल आहे . सामूहिक सुध्दा होण्याची शक्यता आहे . कारण सगळेजण म्हणत आहेत आम्हाला पण उपोषणााला बसायचं आहे . ही शेवटची टक्कर द्यायची , अंतिम लढाई करुन आरक्षण मिळवायचे आहे, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

राज्यात बहुमताच सरकार आहे . तेव्हादेखील हेच होते ना . नुसते खांदे बदलले, नांगराचे बैल बदलल्यासारखे . पूर्वीही तेच होते आत्ता ही तेच आहेत . मराठ्यापुढे सरकार काही करत नाही. आमचं आंदोलन सरकार गांभीर्याने घेईल का नाही, हे आम्ही बघू आता . आतापर्यंत ढकलाढकली होती . आता मुख्यमंत्री फडणवीस आहेत . त्यांना २५ तारखेपर्यंत वेळ गेल्यावर तोपर्यंत काही बोलणार पण नाही, नंतर सोडणार नाही, असेही जरांगे यांनी सांगितले.

गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना मनोज जरांगेंचा इशारा

गृहमंत्रालयावर समाधानी असण्याचं कारण नाही . मस्साजोग आणि परभणीत जीव गेला . मस्साजोग प्रकरणात आणखी आरोपी फरार आहेत . न्याय मिळाला तरी समाधान नाही कारण एका आईचा मुलगा गेला . वाल्मिक कराडबाबत पोलीस योग्य तपास करतील . पोलीस सोडणार नाही कोणालाच . मुख्यमंत्र्याचा तसा शब्द आहे .

धनंजय मुंडेनी राजीनामा द्यावा का त्याबद्दल मला माहीत नाही . मला एवढच माहिती आहे , या प्रकरणात जे जे येतील, मग मंत्री असो , आमदार असो की राष्ट्रपती असो, सुट्टी द्यायची नाही, अन्यथा आम्ही महाराष्ट्र बंद पाडणार . आरोपींनी कोणा कोणाला फोन केले, आरोपींना कोणी पळवून लावले, कोणी आसरा दिला . त्यावेळेस कोणी कोणाला सरकारी पाठबळ दिले, यामध्ये कोण मंत्री आहे का , आमदार आहे का , सरकारमधील मंत्री आहे . सगळे कॉल डिटेल्स घेऊन तपासणी करण्याचा तपास करावी .

एखाद्याला न्याय देण्यासाठी , विरोधी पक्षातला असो का सत्ताधारी पक्षातला असो जो आमदार बोलतो त्याच्या पाठीशी समाधान उभे राहिला पाहिजे . संदीप क्षीरसागर, खासदार, सुरेश धस, येण्यासाठी बोलत आहेत . यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे . हे प्रकरण आम्ही कसल्याच परिस्थितीत दबू देणार नाही . मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या शब्द पाळला नाही राज्य आम्ही बंद पडणार . १००% मराठे रस्त्यावर उतरणार, असे मनोज जरांगे यांनी सांगितले.

# खासदार ओवैसींची सर्वोच्च न्यायालयात याचिका

## 'प्लेसेस ऑफ वर्शिप ऍक्ट' लागू करण्याची मागणी

नवी दिल्ली,०१ जानेवारी : ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलमीनचे (एआयएमआयएम) अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी देशात प्रार्थनास्थळ कायद्याच्या (प्लेसेस ऑफ वर्शिप ऍक्ट) अंमलबजावणीची मागणी केली. यासंदर्भात त्यांनी १७ डिसेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यांच्या याचिकेवर उद्या, गुरुवारी २ डिसेंबर रोजी सुनावणीची शक्यता आहे. ओवैसींच्या वतीन ऍड. फुझैल अहमद अय्युबी युक्तीवाद करणार आहेत.

खा. ओवैसी यांनी आपल्या याचिकेत केंद्र सरकारला कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या सूचना मागितल्या आहेत. ओवेसीच्या वकिलाने सांगितले की अनेक न्यायालयांनी हिंदू याचिकाकर्त्यांच्या याचिकांवर मशिदींचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. दुसरीकडे, मुस्लिम बाजूच्या युक्तिवादांमध्ये जातीय सलोखा आणि मशिदींची विद्यमान स्थिती राखण्यासाठी १९९१ च्या प्रार्थनास्थळांच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी केली जाते. परकीय आक्रमकांच्या हल्ल्यापूर्वी या ठिकाणी मंदिरे होती असा हिंदू पक्षाचा दावा आहे. प्रार्थनास्थळांच्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला अनेक याचिकांमध्ये आव्हान देण्यात आले होते.

# वाहनांना एचएसआरपी बसविण्याचे आवाहन

अहिल्यानगर दि.१- वाहनांच्या नंबर प्लेट मध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे आणि रस्त्यावर धावणाऱ्या वाहनाची ओळख पटविण्याकरिता १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' (एचएसआरपी)बसविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून वाहनांना नंबर प्लेट बसविण्याकरिता जिल्ह्यासाठी सेवा पुरवठादार एफटीए एचएसआरपी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.

एचएसआरपी नंबरप्लेट बुकींग करिता संकेतस्थळ https://maharashtrahsrp.com असे आहे. तसेच, अधिकृत फिटमेंट सेंटर्सची यादी https://transport.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रकाशित केली असून या संकेतस्थळावर नमूद एचएसआरपी उत्पादकांकडून अर्जदारांना अर्ज भरणे, शुल्क अदा करणे, आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेणे, अपॉईंटमेंट घेणे, अपॉईंटमेंटची तारीख बदलणे, सदर प्रक्रीयेबाबत अर्जदाराच्या तक्रारी नोंदवणे याकरिता स्वतंत्र पोर्टल विकसीत करण्यात येत आहे. एचएसआरपी बुकींग करिता वाहनाची अचूक व योग्य माहितीसह विहीत शुल्क भरणे आवश्यक आहे. सदर प्रक्रियेत प्रत्यक्षात वाहनांवरील माहिती व अर्जात भरलेली माहिती यात तफावत आढळून आल्यास भरलेले शुल्क जप्त करण्यात येणार आहे. तसेच बुकींग करुन ९० दिवसांचे आत एचएसआरपी नंबर प्लेट प्रत्यक्षात वाहनांस न बसविल्यास देखील जमा केलेले शुल्क जप्त होऊन एचएसआरपी नंबर प्लेटचे निंदणीकरण होणार आहे. केवळ अधिकृत एचएसआरपी उत्पादकांकडूनच बसविलेली एचएसआरपी नंबर प्लेटच अधिकृत मानली जाईल.

हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी दुचाकी वाहन व ट्रॅक्टर्ससाठी ४५० रुपये, तीनचाकी वाहनांसाठी ५०० रुपये आणि चारचाकी, प्रवासी चारचाकी, ट्रक, ट्रेलर्स व इतर वाहनांसाठी ७४५ रुपये इतका दर निश्चित करण्यात आलेला आहे. सर्व वाहनधारकांनी ३१ मार्च २०२५ पर्यंत अधिकृत फिटमेंट सेंटरद्वारे जून्या नोंदणीकृत वाहनांना एचएसआरपी बसविण्याची कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन अहिल्यानगरचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.

# बाप लेकांनी तहसिल, पंचायत समितीच्या प्रशासनाला धरले धारेवर





तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०१ जानेवारी : तालुक्याच्या राजकारणात प्रथमच माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी धारेवर धरले तहसीलदारांना तर मुलगा आदित्यवर्धन ने पंचायत समिती प्रशासनाला धारेवर धरले होते,

नविनवर्षाच्या पहिल्याच दिवशी अतिवृष्टी अनुदानात तालुक्यातील फक्त २ हजार २५०० शेतकरी पात्र झाले तालुक्यातील ९८ हजार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळायला पाहिजे होती.

इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे सुरू झाले तरी अद्यापही तालुक्यातील शेतकरी वंचित आहेत या कारणाने दि १ जानेवारी रोजी माजी आमदार हर्षवर्धन जाधव हे शेतकऱ्यांसह दुपारी एक वाजता तहसील कार्यालयावर मोर्चा घेऊन आले त्यांनी वेगवेगळे मुद्दे मांडत तहसीलदार विद्याचरण कडवकर यांना प्रश्न विचारले प्रशासनाने तालुक्याची आणेवारीत ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान दाखवले मात्र सर्व ९८ हजार ५६० शेतकऱ्यांचे नुकसान जिरायती म्हणून दाखवले मग बागायती व फळबागावाल्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले नाही का असा सवाल करत जर १५ फेब्रुवारी पर्यंत सर्व शेतकऱ्यांना अतिवृष्टीची नुकसान भरपाई नाही मिळाली तर मी आत्मदहन करीन असा इशारा दिला.

तर याच वेळेला मुलगा आदित्यवर्धन याने पंचायत समिती कार्यालयात मुख्यद्वार लावून निवेदन दिले निवेदन सहाय्यक गटविकास अधिकारी विजय पंडित यांनी स्वीकारले व वरिष्ठांना त्वरित कळवतो असे सांगितले परंतु आदित्य यांनी लेखी पत्र घेतल्या शिवाय जाणार नसल्याचा पावित्र्य घेतल्याने सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांना लेखी आश्वासन घेतल्या नंतरच कार्यालयातुन गेले.




तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



यंदा रब्बी पिके जोमात असून गव्हाचे क्षेत्र चांगलेच वाढले आहे. पिकांना वाढीसाठी गेवराई तालुक्यातील सिरसदेवी शिवारात कोळपणी करतांना शेतकरी (छाया-कृष्णा शिंदे)

# पोलीस अधीक्षकांची मध्यस्थीतीने महिलांचे जलसमाधी आंदोलन मागे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मोठी खळबळ निर्माण झाली. बीडमध्ये सर्वपक्षीय आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आता मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक होताना दिसत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार तीन आरोपींना तात्काळ अटक करा. हेच नाहीतर संतोष देशमुख हत्याप्रकरणी वाल्मिक कराडला हत्येप्रकरणात आरोपी का नाही केले, असा प्रश्न पोलीस अधीक्षकांना ग्रामस्थांनी विचारला.

गावकऱ्यांनी परिसरातील पाझर तलावात जलसमाधी आंदोलन सुरू केले. यानंतर तीन महिलांनी तब्येत खराब झाली. जल आंदोलन ठिकाणी पोलिस अधीक्षक पोहोचले. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली आणि पोलिस अक्षीक्षकांच्या मध्यस्थीनंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनामध्ये पुरुषांसह महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हे आंदोलन दोन तास सुरू होते. तरूण आणि महिला देखील या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.दोन तास सुरू असलेल्या आंदोलनाला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी भेट दिल्यानंतर गावकऱ्यांनी हे आंदोलन मागे घेतले. यावेळी कॉवत यांना महिलांनी जाब विचारत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती. गंभीर आरोप वाल्मिक कराडवर गेले जात आहेत. आज सीआयडीकडून वाल्मिक कराडची चौकशी केली जाणार आहे. या चौकशीचा काल पहिला दिवस होता. काल रात्री उशीरा केज न्यायालयात वाल्मिक कराडला हजर करण्या आले. १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. आता याप्रकरणी काही मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील अजून तीन आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध पोलिसांकडून घेतला जातोय. याप्रकरणी मोठे खुलासे पुढील काही दिवसांमध्ये होऊ शकतात.

# रेल्वे,राष्ट्रीय महामार्गाबाबत खा.सोनवणेंनी घेतली चार तास बैठक

## रेल्वे भुसंपादनाचे विषय तातडीने मार्गी लावा, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा दर्जा राखा; खा.सोनवणेंचे अधिकाऱ्यांना आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

३० डिसेंबर रोजी विघनवाडी- नवगण राजुरीपर्यंत जलदगती रेल्वेची चाचणी घेतल्यानंतर दि.३१ डिसेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी सलग चार तास रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्गाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात मॅरेथॉन बैठक घेतली. यावेळी रेल्वे भुसंपादणाचे विषय तातडीने मार्गी लावा, राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा दर्जा राखा असे आदेशही अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, २६ जानेवारीपर्यंत बीडला रेल्वे येईल, यासाठी प्रयत्न करा, अशा सुचनाही खा.सोनवणे यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०.३० वाजता रेल्वे विभागाच्या बैठकीला सुरूवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, रेल्वे विभागाचे अधिकारी लोळगे, उपजिल्हाधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी घाटनांदुर ता.अंबाजोगाई या ठिकाणी मंत्रीमहोदयांच्या आदेशानुसार अतिजलदगती गाड्यांना थांबा देण्यासाठी कार्यवाही करा, दि.२६ जानेवारी २०२५ पासून बीड-अहमदनगर रेल्वे नियमित सुरु करणे बाबत प्रयत्न करा, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाकरिता रायमोह व धनगरवाडी येथील संपादीत झालेल्या जमिनीचा मावेजा मिळणे करीता मा. उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांना सुचित करा, काकडहिरा या गावातील रेल्वेच्या कामामुळे शेतात जाण्याचा रस्ता बंद झाला आहे, तो रस्ता दुरुस्त करण्यात यावा. काकडवाडी (पिंपळा) ता.आष्टी येथील पुलाचे काम तातडीने करावे असे आदेश देण्यात आले, पिठ्ठी-धामनगांव-टाकळीकाजी या रस्त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यासाठी प्रस्ताव पाठवा, राक्षसभुवन फाटा-उमापुर-शेषगाव या रस्त्यास महामार्गाचा दर्जा देणे बाबत प्रस्ताव पाठवा,

कळंब पुलाजवळचे काम तात्काळ सुरु करावे, महामार्ग क्र. ५४८ या रस्त्यावर नेकनुर या ठिकाणी स्पिड ब्रेकर बसविण्याकरिता संबंधितास आदेशित करण्यात यावे,अंबाजोगाई-केज-नेकनुर-पाटोदा या गावांना बायपास रस्ता मंजुर करण्याकरिता प्रस्ताव सादर करा , पैठण-पंढरपुर महामार्गावरील डोंगरकिन्ही ते अनपटवाडी ता.पाटोदा रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. सदरील रस्ता दुरुस्त करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यासह गुत्तेदारास समज द्यावी अशा सुचनाही खा.बजरंग सोनवणे यांनी यावेळी दिल्या.



### खा.सोनवणे म्हणाले, चर्चा नको, काम दाखवा

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग विभागातील आढावा घेत असताना, अर्धवट कामे, कामाचा ढासळलेला दर्जा, या बाबत खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरून सर्वसामान्य लोकांच्या जीवाशी खेळू नका, असे म्हणत रखडलेले कामे तात्काळ सुरू करण्या संदर्भात सूचना केल्या. रेल्वे विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागाचा संदर्भात आलेल्या सर्व तक्रारी मार्गी लावा, असेही ते म्हणाले.

### रखडलेली कामे सुरू करा

जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाची बहूतेक कामे रखडली आहेत. यात पैठण-पंढरपूर, खरवंडी-नवगण राजूरी, अहमदपूर-चुंबळी, परतूर-बार्शी, लातूर-पाथरी, अहमदनगर- बीड-परळी, गंगाखेड, खरवंडी कासार- पाडळसिंगी या रस्त्यांचा समावेश आहे. सदरील कामे येत्या काळात तत्काळ पुर्ण करा, जिल्ह्यातील नागरिकांच्या जिवीताशी खेळू नका, अशा सुचनाही खा.सोनवणे यांनी दिल्या. केज शहरातुन जाणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गाच्या थांबलेल्या कामांची गती वाढवून ते कामे गतीने कामे पुर्ण करणार आणि धारुर घाटातील रुंदीकरणाचे तसेच उर्वरित काम वेगाने पूर्ण करुन घेणार, असेही ते म्हणाले.

## महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

खामगाव ता गेवराई येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र येथे शुक्रवारी दिनांक ०३ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, कृषि विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग, आत्मा बीड, महिला आर्थिक विकास महामंडळ , उमेद, इफको व धान फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय भव्य महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृवी परभणीचे मा. कुलगुरू प्रा (डॉ) इन्द्र मणि हे असणार आहेत, तर सदर मेळाव्याचे उद्घाटन अविनाश पाठक (भा.प्र.से) जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आदित्य जीवने (भाप्रसे) मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बीड , डॉ. आदिती सारडा कार्यकारी परिषद सदस्य, वनामकृवी परभणी, डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी आणि डॉ. तुकाराम मोटे विभागीय कृषि सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर हे असणार आहेत तर संगीतादेवी पाटील, प्रकल्प संचालक, डॉ.जया बंगाळे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य व श सयप्पा गरंडे कृषि विकास अधिकारी बीड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सौ सिताबाई मोहिते जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त, रामनगर, जालना व डॉ नीता गायकवाड, केंद्र समन्वयक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा. स. सं.प्र कृषीरत महिला , वनामकृवी परभणीचे मार्गदर्शन होणार आहे. तरी या मेळाव्याचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन विस्तार शिक्षण संचालनालय,कृषि विभाग, आत्मा, महिला आर्थीक विकास महामंडळ, उमेद, धान फौंडेशन, इफको, बीड व केव्हीके खामगाव यांनी केले आहे.

# असामान्य कर्तृत्वाची धनी, होती अहिल्या नावाची राणी-डॉ. अशोकराव बांगर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलात अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते तथा शिवशंभो अध्ययन गटप्रमुख डॉ. अशोकराव बांगर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना सांगितले की, ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. न्यायप्रिय, मंदिर जीर्णोद्धारक, उत्तम शासक असलेल्या अहिल्यादेवींचे जीवन आपल्यासाठी आदर्शभुत आहे. त्यांच्या शासन काळाचा जाज्वल्य इतिहास सर्वांसमोर आलाच पाहिजे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनपटाचा अभ्यास आवर्जून करण्याचे आवाहन डॉ. बांगर यांनी केले. असामान्य कर्तृत्वाची धनी, होती अहिल्या नावाची राणी. असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी त्यांच्यावरील साहित्यांचा अभ्यास करावा असे प्रतिपादन केले.

यावेळी संकुलातर्फे अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट उलगडणारी चित्र प्रदर्शनी भरविण्यात आली होती.

यावेळी संकुलातर्फे ... यानिमित्त — 



याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी, व्याख्याते डॉ. अशोकराव बांगर, शालेय समिती अध्यक्ष द्वय मा. प्रमोदराव कुलकर्णी, मा. सतीशराव कुलकर्णी मुख्याध्यापक द्वय श्री विठ्ठल काळे, सौ. बालिकाताई देशमुख, उपमुख्याध्यापक श्री माधव जोशी, त्रि शताब्दी महोत्सव प्रमुख प्रा. विठ्ठल वाघीरकर, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शशिकांत पसालकर यांनी केले तर स्वागत परिचय प्रा. दीपक देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन सौ. आरती कुलकर्णी व आभार प्रदर्शन सौ. सुजाता चिंचपूरकर तर कल्याणमंत्र प्रा. संतोष जोशी यांनी केले.

# ग्रंथाशी मैत्री करा आयुष्य बदलेल-दीपक मुळे

## सावरकर महाविद्यालयात वाचन कौशल्य कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

वाचन आपला श्वास झाला पाहिजे. वाचनाने विचार गतिमान होतात, जीवनात आनंद मिळतो. आपण ग्रंथाशी मैत्री केल्यास आपला आपले जीवन बदलेल असे प्रतिपादन दीपक मुळे यांनी केले. येथील सावरकर महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा निमित्त आयोजित वाचन कौशल्य कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हे होते. पुढे बोलताना दीपक मुळे म्हणाले की आपली वाचनाची सवय कमी झाली आहे. ग्रंथ सारखा मित्र नाही ग्रंथाशी मैत्री केल्याने आपले जीवन आनंदी होईल. वाचनाचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ग्रंथांचे वाचन करावे. वाचनाने व्यक्तिमत्व विकसित होते. मान्यवरांचे स्वागत उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, डॉ. देविदास नागरगोजे यांनी केले. मान्यवरांचा परिचय डॉ. सोपान सुरवसे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी केले तर आभार प्राध्यापक संजय काळे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती

# नववर्षाच्या पूर्वसंध्येला बीड तालुक्यातील ए पी एल शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबाच्या खात्यात दोन कोटी एक्केचाळीस रुपये जमा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८७ , अंत्योदय योजनेचे ७३८४ , ए पी एल योजनेचे शेतकरी १९०६६ , एन पी एच योजनेचे ९२७७ , शुभ्र शिधापत्रिका धारक १५६८ असे एकुण १००७८२ शिधापत्रिकाधारक आहेत . तालुक्यात एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकाने आहेत . १९०६६ ए पी एल शेतकऱ्यापैकी ५८०० शिधापत्रिकाधारक यांना एपीएल डीबीटी द्वारे रोख रक्कम प्राप्त झाली असून त्यापैकी ३७८२ लाभार्थी यांच्या खात्यात प्रतिव्यक्ती १७० प्रमाणे २ कोटी ४१ लाख ४१०६१ रुपये महिला कुटुंब प्रमुख यांच्या खात्यात नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला जमा झाले आहेत . उर्वरित २०१८ शेतकरी लाभार्थी यांनी बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही . तरी त्यांनी बँक खाती केवायसी करून घ्यावीत , असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी केले आहे . तसेच ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही त्या शिधापत्रिका धारक यांनी आपल्या कुटुंबातील महिलेचे बँक पासबुक , आधार कार्ड व कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा असे आवाहन अव्वल कारकून श्री संतोष मुळीक यांनी केले आहे .



तहसीलदार चंद्रकांत शेळके हे ऑगस्ट महिन्यात बीड तहसीलदार पदावर रुजू झाले . तेव्हापासून त्यांनी तालुक्यातील मंडळाच्या ठिकाणी बैठका घेण्याचा धडाका सुरू केला . या बैठकांना स्वस्त धान्य दुकानदार यांनाही बोलावण्यात आले . या बैठकीस सर्वसामान्य शेतकरी , नागरिक , स्वस्त धान्य दुकानदार समोरासमोर असल्याने त्यांच्या समस्यांचे समाधान तात्काळ होण्यास सुरुवात झाली . स्वस्त धान्य दुकानासंदर्भात काही तक्रारी असल्यास त्यांचे निराकरण करण्यासाठी पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर हे सुद्धा वेळोवेळी भेटी देतात .

सध्या पी एच एच व अंत्योदय शिधापत्रिका धारक यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत करणे सुरू असून लहान मुले व वयस्कर कुटुंब प्रमुख यांची केवायसी सध्या होणार नसून कुटुंबातील इतर व्यक्ती यांनी केवायसी साठी स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे जाऊन शह्नूल करावी . ही सुविधा निशुल्क उपलब्ध आहे . त्यासाठी कोणताही खर्च आकारण्यात येत नाही . याबद्दल सर्व बीड तालुक्यातील एकूण ३४८ स्वस्त धान्य दुकानदार यांना सूचित करण्यात आले आहे . तसेच जर स्वस्त धान्य दुकानदार हे ईकेवायसी करण्याकरिता शुल्क मागत असतील तर त्याबाबत तहसील कार्यालय बीड येथे तक्रार नोंदवावी असे आवाहन तहसीलदार शेळके यांनी केले आहे.तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चऱ्हाटा येथील मंडळ स्तरीय बैठकीनंतर स्वस्त धान्य दुकानास भेट देऊन लाभार्थी यांना वेळेवर धान्य देण्यात येऊन ई केवायसी लवकरात लवकर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

तहसील कार्यालया अंतर्गत पुरवठा विभागातील निरीक्षण अधिकारी , पुरवठा निरीक्षक यांना धान्य वाटप संदर्भात स्वस्त धान्य दुकान अचानक भेट देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत असे यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले.

# चि.डॉ. किशोर बाबूराव दळवे हे पीएचडी देऊन सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ जानेवारी**

केज तालुक्यातील चिंचोली( माळी) येथील भूमिपुत्र डॉ. किशोर दळवे यांनी एमजीएम युनिव्हर्सिटी संभाजीनगर या विद्यापीठाची मानाची पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. किशोर दळवे यांनी बीबीए, एमबीए (एच आर) एमबीए (आर ए बी एम) ; एमसीए या पदव्या विविध विद्यापीठाकडून प्राप्त केल्या असून असून नुकतेच त्यांना मॅनेजमेंट सायन्स या विषयात पीएचडी ही पदवी दि.३१-१२-२०२४ रोजी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सपकाळ सर यांच्या हस्ते देऊन विद्यापीठाच्या विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

त्यांना डॉ.प्रवीण शास्त्री सरांचे मार्गदर्शन लाभले असून या पदवीदान कार्यक्रमास ईतर मार्गदर्शक व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ.किशोर दळवे त्यांचा सत्कार करण्यात आला त्यांच्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांचे अभिनंदन मुख्यतः पुढील पदाधिकारी, नातेवाईक व सहकारी यांनी केले आहे यात, दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सौ.आशा दळवे; डॉ. दया पाटिल ;डॉ. कोरडे सर ;श्री बाबुराव दळवे;श्री दगडू भाऊ दळवे; श्री महादेव दळवे;श्री अशोक मिरगे श्री.वसंतभाऊ कातळे,श्री शिवाजीराव जाधव,श्री अशोक तारळकर तसेच त्यांचा मित्रपरिवार व सहकारी, पत्रकार बांधव यांचा समावेश आहे.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात तृतीय आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न



नगर : आरोग्य क्षेत्रात होणाऱ्या जलद गती बदलामुळे परिचारिका क्षेत्रामध्ये सार्वभौम, सशक्त व मजबूत नेतृत्वाची गरज भासत आहे. परिचर्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नेतृत्वांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या आव्हानांवर नेहमी मात करावी लागते. आरोग्य क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा परिणाम हा परिचर्या क्षेत्राच्या नेतृत्वामध्ये बदल घडून आणण्यास कारणीभूत आहेत. आरोग्य सेवा प्रणालीवरील ताण आणि आरोग्यासंदर्भातील जागतिक समस्यांना सामोरे जाण्यासाठी परिचारिका क्षेत्रामध्ये सार्वभौम सक्षम असे नेतृत्व तयार होणे गरजेचे आहे, ज्यामुळे परिचर्या क्षेत्राचे भविष्य हे उज्वल होऊ शकेल. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचार्या महाविद्यालयाने २० वर्षा चा कार्यकाल यशस्वीरित्या पूर्ण केला असून यानिमित्ताने महाविद्यालयात सक्षम सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्राचे भविष्य उज्वल करणे या विषयावर दिनांक २८ डिसेंबर२०२४ रोजी तृतीय आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली.

परिषदेची सुरुवात माझी पंतप्रधान स्वर्गीय डॉ.मनमोहन सिंग, यांना श्रद्धांजली देऊन करण्यात आली. परिषदेच्या प्रमुख पाहुण्या म्हणून माननीय डॉ . एम . प्रकासम्मा , या होत्या. सदार परिषदेसाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा माननीय सौ. शालिनीताई विखे पाटील आणि डॉ.नीलिमा सोनवणे, अतिरिक्त नर्सिंग संचालक, आरोग्य आयुक्तालय, मुंबई कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मा . वसंतराव कापरे, विश्वस्थ डॉ . विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन , डॉ . पी . एम. गायकवाड ,संस्थेचे प्रभारी सेक्रेटरी, प्रा. डॉ. अभिजीत दिवटे,संचालक (वैद्यकीय), डॉ.रामचंद्र पडळकर मुख्य प्रशासकीय अधिकारी या परिषदेकरिता उपस्थित होते.

नेतृत्व हे केवळ ज्ञान आणि कौशल्यांपुरते मर्यादित नाही, तर ते नैतिकता, करुणा आणि सहकार्य या मूल्यांवर आधारित असले पाहिजे असे मत जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनीताई विखे पाटील यांनी मांडले.

या संमेलनाद्वारे आपण नर्सिंग क्षेत्राच्या नेतृत्वाला नवी दिशा देणार आहोत. मला विश्वास आहे की, आपल्या विचारांची देवाणघेवाण ,सार्थक संवाद ,सर्वांचे सक्रिय योगदान यातून एक स्थिर आणि सर्वसमावेशक नेतृत्व विकसित होईल असा विश्वास माननीय डॉ . एम . प्रकासम्मा यांनी व्यक्त केला .

डॉ. जॉय पायपर, सहाय्यक प्राध्यापक ग्राउंड कॉलेज, संयुक्त राज्य अमेरिका (यु.एस.ए.) यांनी परिचर्या क्षेत्रामध्ये परिपूर्ण क्षमतेचे नेतृत्व तयार करून परिचारिका सेवेचा दर्जा उंचावणे' या विषयावर आपले मत मांडले.

भविष्यातील नेतृत्व : परिचर्या क्षेत्रातील नेतृत्वाचे सक्षमीकरण या विषयावर बोलताना ,डॉ. सुवरेश नरुला खन्ना, प्राध्यापक व संस्थापक इमिरियट्स पेट्रोन, न्यूयॉर्क (अमेरिका) म्हणालया कि ,आपल्याला असे नेतृत्व विकसित करावे लागेल जे नैसर्गिक असून आपल्या प्रयत्नांतून आणि दृष्टिकोनातून निर्माण होईल.

अनुकरणीय सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्रात नेतृत्व उंचावणे यावर बोलताना विविध आव्हाने आणि संकटांना सामोरे जाताना आपल्याला उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता ,मानसिक दृढता ,संवेदनशीलता या गुणांची आवश्यकता असते असे डॉ. नानसी डायस, सहाय्यक प्राध्यापक, पश्चिम कॅरोलीना विद्यापीठ यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच मुंबई येथील हिंदुजा हॉस्पिटल हॉस्पिटल च्या संचालक डॉ.फलाक्षी मांजरेकर यांनी 'सशक्त नेतृत्व तयार करणे 'परिचारिका क्षेत्रात नेतृत्वाचे भविष्य: आव्हान आणि संधी' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डॉ. शोभा गायकवाड, सहाय्यक प्राध्यापक एसएनडीटी परिचर्या महाविद्यालय, महिला विद्यापीठ मुंबई यात सहभागी होत आहेत. तसेच या चर्चासत्रामध्ये सौ.ग्रेसी मथाई, सीओ बेबी मेमोरिअल हॉस्पिटल कालिकत,केरळ ,डॉ. नीलिमा सोनवणे, अतिरिक्त नर्सिंग संचालक, आरोग्य आयुक्तालय, मुंबई, महाराष्ट्र, डॉ.अजिता नायर,मॅनेजिंग डायरेक्टर हेल्थ बीज हेल्थकेअर मॅनेजमेंट. सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड आणि डॉ. पर्ल क्रूज,लीड हेमेटॉलॉजी रिसर्च. क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटल ,आयएनएच इंग्लंड ,यांनी सभाग घेतला आणि आपले मत व्यक्त केले.

या परिषदेचा ७४६ शिक्षक, परिचारिका व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला . या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये कतार , यू . एस. , यू. के .,राजस्थान , गुजरात इ. ठिकाणाहून अनेक सदस्यांची सहभाग घेतला व ६२ विद्यार्थी व शिक्षकांनी आपले शोध निबंध सादर केले. सर्वात्कृष्ट शोध निबंध सादर करणाऱ्या विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्यासाठी फाउंडेशनचे प्रा. डॉ. अभिजीत दिवटे,संचालक (वैद्यकीय) यांचे मार्गदर्शन लाभले .

संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.रामचंद्र पडोळकर आणि प्रा. डॉ. प्रतिभा चांदेकर, प्राचार्या, परिचार्या महाविद्यालय यांच्या नेतृत्वाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले .

भारतीय परिचर्या परिषदेकडून १ तर महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडून २ क्रेडिट पॉईंट देण्यात आले. महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडून श्री. पंकज काळे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहीले तसेच श्रीमती. आग्नेस अरुण स्वामी , यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, या विद्यापीठाकडून निरीक्षक म्हणून काम पाहीले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये परिचर्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्वांनी आपली मते मांडली. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांनी यशस्वीरित्या परिषदेच्या आयोजनाबद्दल कौतुक केले . प्रा. अमोल टेमकर , परिषदेचे आयोजक , यांनी आभार प्रदर्शन केले .या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी परिचर्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## सिल्लोड येथे भीमा कोरेगाव शहिदांना अभिवादन



सिल्लोड प्रतिनिधी आज दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी सिल्लोड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर मध्ये भीमा कोरेगाव संग्रामातील शहीद झालेल्या सैनिकांना मानवंदना व आदरांजली च्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रथमेश उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले

एक जानेवारी १८१८ रोजी भीमा नदीच्या तीरावर झालेल्या या लढाईत ५०० महार बटालियन यांनी मोठ्या शौर्याने ही लढाई लढून २५००० सैनिकांचा पराभव केला या लढाईमध्ये ५०० महार सैनिकांना वीरमरण आले असं बोलताना माजी उपनगराध्यक्ष संजय आरके यांनी आपले विचार मांडले या युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना उपस्थितांकडून मानवंदना देण्यात आली कार्यक्रमास शेषराव आरके उत्तम आरके, देविदास दांडगे, एडवोकेट शंकर आरके,माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, सुरेश आरके, दयानंद आरके, संदीप दांडगे,प्रकाश बनकर, प्रकाश आरके,सुनील म्हातरजी आरके, अतुल आरके,कैलास आरके, गणेश आरके,गौतम आरके, कृष्ण दाभाडे,दिलीप भुईगळ, सुनील आरके,अतुल आरके, अमीर पठाण,गणेश राऊत, राहुल राऊत,बंडू आरके, सोमा आरके,दिलीप आरके, राहुल दाभाडे,संगीता आरके, देविदास आरके, अरविंद आरके, सुभाष बनसोडे,भारत आरके, आकाश आरके,इत्यादी मान्यवर व भीमसैनिक फार मोठ्या संख्येने महिला व पुरुष हजर होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद आरके यांनी केले तर आभार भारत आरके,यांनी मानले.

## श्री.स्वामी समर्थ पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश गिरी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१ जानेवारी

श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. आमखेडा पंतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सोयगाव वकील महासंघाचे अध्यक्ष ड.राजेश अमृत गिरी यांचा वाढदिवस श्री स्वामी समर्थ पतसंस्था येथे मित्र परिवारांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शेख जावेद उपाध्यक्ष मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ मुंबई,पतसंस्थेचे संचालक विष्णू दुसाने,अमोल निकम,सतीष कोलते,कदीर शहा,छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँक सोयगाव अमोल पाटील,अनिल पाटील, मॅनेजर बाळू बोरसे,सोयगाव व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विवेक महाजन,पत्रकार राजेंद्र दुत्तोंडे,योगेश बोखारे, रवींद्र पाटील, विनोद कायस्थ सुनिल सैगदाणे,इग्रजिंत खंस,पुरुषोत्तम खंस, गणेश पवार,आदीसह मान्यवर उपस्थित होते.

## वैंभवी आठवले विंचुर्णे-बर्दापूरकर पारितोषिकांची मानकरी

छत्रपती संभाजीनगर, दि. १ : एमजीएम विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाच्या पदवी परीक्षेत सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस देण्यात येणारे मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिक वैभवी रामानंद आठवले हिला जाहीर झाले आहे.

एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर आणि विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालच्या प्राचार्या डॉ.रेखा शेळके यांनी आज ही माहिती दिली. मराठी पत्रकारितेतील ज्येष्ठ संपादक मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या या पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे. एमजीएम विद्यापीठ आणि बर्दापूरकर कुटुंबीय, यांच्या संयुक्त योगदानातून हे पारितोषिक सुरु करण्यात आले आहे. या पारितोषिकात रोख रक्कम आणि स्मृतिचिन्हाचा समावेश आहे. वैभवी आठवलेने आंतरराष्ट्रीय पत्रकारिता या विषयात सर्वोच्च गुणांसह पदवी संपादन केली असून सध्या ती एका आंतरराष्ट्रीय संस्थेसाठी हवामान विषयक प्रकल्पावर काम करत आहे. आठवले कुटुंबीय मूळचे हिंगोली येथील आहे.

राष्ट्रीय पत्रकार दिनी, सोमवार ६ जानेवारीला सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या आचार्य विनोबा भावे सभागृहात ज्येष्ठ पत्रकार, दैनिक 'महाराष्ट्र टाईम्स'च्या प्रगती बाणखेले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विलास सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम आणि ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. पुरस्कार वितरणानंतर राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त प्रगती बाणखेले यांचे माध्यमांची नैतिकता या विषयावर व्याख्यान होईल.

पत्रकारितेचा गेल्या सुमारे दोन दशकांचा अनुभव असलेल्या प्रगती बाणखेले हे समकालीन पत्रकारितेतील हे ठळक नाव आहे. मराठीतील आघाडीवरच्या 'महाराष्ट्र टाईम्स'या दैनिकासाठी पत्रकारिता करताना अत्यंत संवेदनशीलपणे केलेले प्रगती बाणखेले यांचे लेखन गाजलेले आहे. 'अभ्यासोनि प्रकटावे' अशी त्यांची लेखन धारणा आहे.

## संघटन पर्व सदस्यता नोंदणी अभियानअंतर्गत तरोडा-सांगवी मंडळ सदस्य नोंदणी कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ जानेवारी**



तरोडा सांगवी मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत कदम यांच्यावतीने मंडळातील पदाधिकारी, शक्तिकेंद्र, बुथ प्रमुख, सदस्य नोंदणी कार्यशाळेचे आयोजन साईबाबा मंदिर, चैतन्यनगर, नांदेड येथे दि. १ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले होते.

यावेळी भारतीय जनता पक्ष हा एक विशाल कुटुंबसारखा आहे. अधिकाधिक सदस्य नोंदणीमुळे पक्षाची ताकद वाढते आणि आपण अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतो. नोंदणी ही फक्त संख्यात्मक वाढ नसून पक्षाची तत्त्वे समजून घेण्याची आणि सक्रिय सहभागाची संधी त्यातून प्राप्त होते . या सदस्यता नोंदणी अभियानाद्वारे भाजपला आणखी मजबूत बनवण्यासाठी एकत्र काम करण्यासाठी आणि पक्षाची नीती व तत्त्वे घराघरांत पोहोचवण्यासाठी तरोडा-सांगवी मंडळ अंतर्गत सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, असे आयोजक मंडळ अध्यक्ष सूर्यकांत कदम यांनी सांगितले. या कार्यशाळेत मा.जिल्हाध्यक्ष मा.प्रविणभाऊ साले, सरचिटणीस विजय गंभीरे, उत्तर विधानसभा अभियान प्रमुख अमोल कदम, मा नगरसेवक सदाशिव पुरी, जि. उपाध्यक्ष संतोष परळीकर, कैलास सावते,मंडळाध्यक्ष सूर्यकांत कदम, मंडळ संयोजक निलेश कुंटूरकर, मंडळ सरचिटणीस बालाजी पुयड, दत्तात्रय मुंडकर, सहसंयोजक अशोक टाक, दिलीप सावंत, प्रेमराज कोकाटे प्रसाद जोशी,विजया कटकमवार, वैशाली देबडवार, धनश्री कुलकर्णी अमृता जोशी व सर्व सन्मानीय शक्तिकेंद्र प्रमुख, बुथ प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

## आ. बोंढारकर यांच्या हस्ते कैलास गायकवाड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ जानेवारी :** नवीन नांदेड सिडको येथे लहुजी साळवे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीच्या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कैलास गायकवाड यांचा दक्षिण नांदेडचे आमदार आनंदराव पाटील बोंडारकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कैलास गायकवाड हे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेचे प्रमुख असून राज्यभर त्यांनी व्यसनमुक्तीचे शेकडो उपक्रम राबविले आहेत. समाज प्रबोधनामध्ये देखील त्यांचा तेवढाच मोठा सहभाग आहे. त्यांच्या समाजकार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार दिला आहे. या गोष्टीचे औचित्य साधून क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात कैलास गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर पांडुरंग सूर्यवंशी, अंबादास मेकाले, चंद्रकांत मेकाले, पप्पू गायकवाड, श्रीरंग खानजोडे आणि अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कारप्राप्त आर. जे. वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## १ जानेवारी पासून राज्य रस्ता सुरक्षा अभियानाचा प्रारंभ

अहिल्यानगर : रस्ते अपघात कमी करण्यासाठी तसेच रहदारीच्या नियमांबाबत जनतेमध्ये जागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. यावर्षीही महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्त कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या संपूर्ण महिन्याभरात काळजी ही थीम / संकल्पना वापरून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येणारअसल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली. जिल्हा पोलीस दल, आरोग्य, शिक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने तसेच जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली याबाबतचे नियोजन लवकरच करण्यात येणार आहे. रस्ता सुरक्षा संदर्भात प्रसार माध्यमातून व्यापक प्रसिद्धी करण्यात येणार असून याकरिता स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांना देखील सहभागी करून घेण्यात येणार आहे.

## थर्टीफस्टचा पैठणला वीर बजरंगी नामाचा जयघोष

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०१ : ३१ डिसेंबर निमित्त राजस्थान युवक मंडळाच्या वतीने पैठण शहरातील बारा ठिकाणी १०८ संगीतमय हनुमान चालीसाचे आयोजन करण्यात आले सध्याच्या पिढीत ३१ डिसेंबर व नवीन वर्षाचे स्वागत म्हणजे फक्त रात्री मनोरंजन करणे दारू पिणे डान्स करणे इत्यादी अशा परिस्थितीत राजस्थान युवक मंडळाच्या वतीने १०८ हनुमान चालीसाचे आयोजन दुपारी दोन पासून ते रात्री साडेबारा वाजेपर्यंत करण्यात आले त्यामुळे नवीन पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करण्याच्या हेतूने ह्या आगळ्यावेगळ्या अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले शहरातील पुरुष महिलांनी वारकरी शाळेतील विद्यार्थ्यांनी ह्या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता अशा कार्यक्रमामुळे शहरातील वातावरण हनुमान व



रामने बनले होते शहरातील कानाकोपऱ्यात फक्त हनुमान चालीसाचे आवाज घुमत होते अशा आवाजामुळे पैठण शहरातील रस्त्यांवर चालणारे नागरी मंदिर परिसरातील राहणारे नागरिक व हजारोच्या संख्येने मंदिरात बसून हनुमान चालीसाचे पठण करणारे नागरिकांच्या तोंडात फक्त हनुमान चालीसा येत होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजस्थान युवक मंडळाचे सर्व पदाधिकारी व ह्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांनी प्रयत्न केले.

ह्या कार्यक्रमाचे आयोजन शहरातील बालाजी मंदिर दुर्गावाडी राजस्थान युवक मंडळ व माहेश्वरी महिला मंडळ, काळा मारुती मंदिर रेणुका देवी गल्ली श्रीनाथ भजनी मंडळ, दक्षिण मुखी मारुती मंदिर रामनगर भक्त परिवार, प्रभात फेरी परिवार सप्तशृंगी मंदिर यशवंतनगर, कालिकादेवी महिला मंडळ रंगारहाटी, दत्त मंदिर भक्त परिवार नवीन कावसान, नवले महाराज मठ यशवंतनगर, सिद्धीविजय हनुमान मंदिर पेठुंबरागल्ली, सावता भजनी मंडळ साळीवाडा, उदय भारत गणेश मंडळ लोहारगल्ली व वारकरी संस्था पैठण येथील ६६० महिला व पुरुष या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.६१६/२०२४

अर्जदार : १) प्रतिभा भ्र. रंजयकुमार मेनगर, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. कडीत बु. ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर ह.मु. शिक्षक कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) सायली पि. रंजयकुमार मेनगर, वय २१ वर्षे, धंदा शिक्षण रा. शिक्षक कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) अथर्व पि. रंजयकुमार मेनगर, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण रा. अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.१

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे रंजयकुमार पांडुरंग मेनगर हे मुळचे कडीत बु. ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर येथील रहिवाशी होते ते शासकीय नौकरी निमीत्त गंगापुर येथे स्थायिक झाले होते व ते दिनांक ०४/१२/२०२४ रोजी गंगापुर येथे मयत झालेले आहे परंतु त्यांचा अंत्यविधी हा त्यांच्या मुळ गावी कडीत बु. ता. गंगापुर येथे झालेला आहे. मयत रंजयकुमार पांडुरंग मेनगर यांचे वडील नामे पांडुरंग पुंजा मेनगर हे दिनांक १९/०३/२०२० रोजी मयत झालेले असुन मयताची आई नामे राधाबाई पांडुरंग मेनगर ह्या दिनांक २८/११/२०२३ रोजी मयत झालेल्या आहे. मयत रंजयकुमार पांडुरंग मेनगर यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०१/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापूर

## बापोद्राने बादशाहला लाच दिली

सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेने पुष्पा (करुणा पांडे) या खंबीर आणि कणखर स्त्रीची प्रेरणादायक कहाणी सांगून प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. अलीकडच्या भागांमध्ये पुष्पाच्या टिफिन डिलिव्हरीमध्ये झुरळं ठेवून बादशाह तिचा बदला घेण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा पुष्पाच्या ही गोष्ट लक्षात येते, तेव्हा ती त्याला माफ करते आणि त्याच्या विरुद्ध कार्यवाही न करण्याची पोलिसांना गळ घालते. आगामी भागांमध्ये, एक धक्कादायक सत्य उघडकीस येते. बादशाहला लाच देऊन गोंधळ माजवायचा आणि त्याचा फायदा घेऊन, मीडियाला त्यात गुंतवून दिलीप पटेलला (जयेश मोरे) चाळीच्या बाहेर काढण्यासाठी बापोद्राने हे षडयंत्र रचलेले असते. पण या सगळ्या प्रकाराला एक भलतेच वळण लागते, कारण दिलीपला बादशाहच्या हालचाली संशयास्पद वाटतात आणि तो बादशाहला एका कारमध्ये कोंडून ठेवतो. त्याच्या लक्षात येत नाही की, आत बादशाहचा जीव गुदमरत असतो. पुष्पा वेळेवर येऊन बादशाहला वाचवते. दरम्यान बालसुधार गृहाचे सदस्य चाळीत येतात आणि मुलांना सांभाळण्याच्या पुष्पाच्या क्षमतेवर सवाल उठवतात.

## नगर अर्बन बँकेतील ते लॉकर्स उघडण्याचा बँक प्रशासनाचा निर्णय

नगर : नगर अर्बन बँकेच्या विविध शाखांमधील लॉकर्स बाबत वारंवार जाहीर निवेदने दिल्यानंतरही तसेच संबंधित लॉकर्सधारकांना नोटीसा पाठवून संपर्क करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही भाडे भरण्यासाठी संबंधित लॉकरधारक अथवा त्यांचे कायदेशीर वारस हे पुढे न आल्याने अखेर ते १३२ लॉकर्स कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पंचांसमक्ष उघडण्याचा निर्णय बँक प्रशासनाने घेतला असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

अनेक वर्षांपासून बंद असलेल्या विविध शाखांमधील लॉकर्स बाबत बँक प्रशासनाने संबंधितांना उपलब्ध असलेल्या पत्त्यांवर नोटीसा पाठवून तसेच उपलब्ध असलेल्या मोबाईल - दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र १३२ लॉकरधारकांनी अद्याप बँक प्रशासनाकडे संपर्क साधलेला नाही. लॉकर भाड्यापोटी मोठी रक्कम संबंधितांकडून बँकेला येणे आहे. त्यामुळे असे लॉकर्स कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पंचांसमक्ष उघडून त्यातील चीज वस्तू / मुद्देमाल सीलबंद करून मुख्य शाखेतील लॉकरमध्ये ठेवण्यात येणार आहेत. तसेच थकीत लॉकरचे भाडे संबंधित लॉकरधारक अथवा त्यांचे वारस यांचेकडून किंवा मुद्देमालाचा लिलाव करून वसूल करण्यात येणार आहे.

या लॉकरधारकांची यादी बँकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.nucb.in वर प्रकाशित करण्यात आलेली असून लॉकरधारकांनी तात्काळ संबंधित शाखेची अथवा बँक प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

**नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहिल्यानगर**
(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक) (अवसायनांतर्गत) - बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहिल्यानगर-४१४००१
Email - recovery@nucb.in Website-www.nucb.in, Ph-0241-2343641/42,Fax No.2346951

**ताबा नोटीस**
रुल८(१) नुसार

ज्या अर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक लि., अहिल्यानगर (मल्टि- स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट) २००२ (५४ of २००२) अन्वये त्यांना सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ३ वाचता प्राप्त अधिकाराचा वापर करुन सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२ नुसार मागणी नोटीस पाठवून सूचना केली होती. थकबाकी मागणी नोटीस दिल्याचे तारखेपासून ६० दिवसांच्या आत त्यावरील व्याज व इतर कायदेशीर खर्चासह भरण्यास सांगितले होते. कर्जदार हे खालील रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम जनतेला सदरच्या नोटिसेद्वारे सूचित करण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन कायदा कलम १३ (४) नियम ८ प्राप्त अधिकारानुसार खालील सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खालील नमूद तारखेनुसार मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे. कर्जदार, जामीनदार व अन्य आणि सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक लि., अहिल्यानगर (मल्टि- स्टेट शेड्युल्ड बँक) यांचा बोजा राहिल. सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायदयाच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

| कर्जदार/सह कर्जदार/ जामीनदार यांचे नाव व शाखा | मालमत्तेचे विवरण चतु:सिमेसह | मागणी सूचनेत निर्देशित केलेली रक्कम व दिनांक |
|---|---|---|
| शाखा - परळी वैजनाथ, जि.-बीड<br>कर्जदार-मे. केदार फर्निचर वर्क्स प्रो.प्रा.सौ.संजीवनी किर्तीकुमार नरवणे<br>जामिनदार-<br>१) श्री.सतीश मन्मथआप्पा रेवडकर<br>२) श्री.केदार किर्तीकुमार नरवणे | अ)कर्जदार सौ.संजीवनी किर्तीकुमार नरवणे यांचे नावावरील ताबा घेतलेल्या मिळकतचे वर्णन:- जिल्हा तुकडी बीड पोट तुकडी परळी वैजनाथ जिल्हा परिषद बीड व कसबे /शहर परळी वैजनाथ ,जि.बीड येथील नगर परिषद जुना घर क्र. ४४८/१,नवा घर क्र.९१ जुना वार्ड क्र.१, नवीन वार्ड क्र.७,नगर भु-मापन क्र.१६१८ मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ ६०० चौ.फुट बांधकामासह मिळकत ज्यांची चतु:सिमा खालील प्रमाणे - पूर्व :-नागनाथ चाटे यांचे घर पश्चिम:- ठाकूर यांचे घर दक्षिण:- टॉवर - गणेशपार रस्ता उत्तर:- गाजरगुंडे यांचे घर | मागणी सुचनेची दिनांक:-०६/१०/२०२१<br>नजर गहाण कर्जाची दिनांक ३०/०९/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु.४,७२,३१२/-अक्षरी रु.चार लाख बहात्तर हजार तीनशे बारा फक्त) व दि. ०१/१०/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज आणि त्यावरील खर्च<br>प्रतिकात्मक ताबा दिनांक:-२७/१२/२०२४ |

ठिकाण- परळी वैजनाथ,जि.-बीड
दिनांक- २७/१२/२०२४

प्राधिकृत अधिकारी
नगर अर्बन को. ऑप.बँक लि.(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक) केंद्रशासनाधिन अवसायानाअंतर्गत, अहिल्यानगर
ARL

## अग्रलेख...

# नव्या आरंभाचे ठरो नवे वर्ष

हिंदू नव वर्षाचा आरंभ व्हायला अद्याप वेळ असला तरी २०२५ हे इंग्रजी नवीन वर्ष आजपासून सुरू झाले आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या पाव भागातले हे शेवटचे वर्ष. भारताचे आराध्य दैवत असलेल्या रामललाच्या मूर्तीची अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा होऊन २०२४ हे वर्ष सुरू झाले होते आणि गुकेश डोम्माराजूने बुद्धिबळातील जगज्जेता म्हणून भारताचे नाव इतिहासात कोरले तेव्हा हे वर्ष संपायला आले होते. मनोहर जोशी, पंकज उदास यांच्यासारख्या नामवंतांचा मृत्यू, काही नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती असे बरेच काही दुःखद २०२४ मध्ये घडले. तरीही या वर्षाचा एकूण बाज हा सकारात्मक, विधायक अशा स्वरूपाचा होता. भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. २०२४ मध्ये भारताचा ७५ वा प्रजासत्ताक दिन पार पडला. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले. जम्मू-काश्मिरात विधानसभेची निवडणूक झाली. पाच हजार कोटी रुपये खर्चून पार पडलेल्या अंबानींकडल्या लग्नाने देशाचेच नव्हे, तर जगाचे डोळे विस्फारले. भारतीय न्याय संहितेसह तीन नवे कायदे तसेच पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातील हिंदू, शीख, जैन, ख्रिश्चन, बौद्ध आणि पारशी समुदायांना दिलासा देणारा सिटिझनशिप अमेंडमेंट ॲक्ट हा कायदा अंमलात आला. इलेक्टोरल बॉण्ड स्किम घटनाबाह्य असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. याच वर्षात माओवाद्यांच्या विरोधात ठोस कारवाई सुरू झाली आणि त्यांच्या निःपातासाठी निर्णायक पावले पडतानाही दिसली. भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद सोडवण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न सुरू झालेत. पॅरिसच्या ऑलिम्पिकमध्ये भारताने चांगली कामगिरी बजावली. इस्रोने २०२४ मध्ये बऱ्याच महत्त्वाकांक्षी मोहिमा यशस्वी केल्या. आदित्य-एल-वन ही त्यातील सर्वांत महत्त्वाची मोहीम. आरजी कार मेडिकल कॉलेजमधील बलात्काराचे प्रकरण देशभर गाजले. त्या घटनेचे दुखणे अजून संपलेले नाही. अशा विषयांवरचा आक्रोश संपू देखील नये. कारण आक्रोश सुरू राहिला तरच अशा घटनांच्या प्रतिबंधासाठी ठोस पावले उचलली जाण्याची शक्यता वाढत असते. २०२४ हे वर्ष बव्हंशी आश्वासक राहिले असले तरी अशा काही घटनांनी चिंतेचे वातावरण देखील निर्माण केले होते, हे आपल्याला विसरता येणार नाही. जम्मू-काश्मिरात यशस्वीरीत्या विधानसभेची निवडणूक पार पडली असली तरी याच वर्षात हिंदू भाविकांवर लष्कर-ए-तोयबाच्या अतिरेक्यांनी हल्ला केला आणि नऊ जणांचे जीव घेतले, हेही आपल्याला विसरता येणार नाही. सीमावर्ती भागांत अनेक जवानांना हौतात्म्य आले, रेल्वेचे अपघात झाले, इमारती कोसळल्या आणि माणसं मेली, उत्तर भारतात अतिवृष्टीने शेकडोंचे जीव गेले, इस्पितळांमध्ये आग लागून चिमुकल्यांचे जीव गेले अशा अनेक घटना आहेत, ज्यांचे विस्मरण होता कामा नये. २०२५ या इंग्रजी नव्या वर्षाचा आरंभ करताना अशा दुःखद घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी सर्वप्रथम आपण सर्वांनी संकल्प केला पाहिजे. २०२४ मध्ये अयोध्येत रामललाची प्राणप्रतिष्ठा झाली. आता २०२५ मध्ये मथुरा मुक्त व्हावी, हाही तमाम भारतीयांसाठी संकल्पाचा विषय असला पाहिजे.

२०२४ हे लोकसभा निवडणुकीचे वर्ष होते. महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये देखील निवडणुका झाल्या. २०२५ मध्ये दिल्ली विधानसभा आणि बिहार विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. २०२४ मध्ये भाजपाच्या विरोधकांनी ईव्हीएमच्या नावाने बोंबा ठोकल्या. पण, त्यात त्यांना यश आले नाही. आता २०२५ मध्ये तरी विरोधकांनी सुधरले पाहिजे आणि निवडणुकीच्या माध्यमातून जनतेने दिलेल्या कौलाचा सन्मान करायला शिकले पाहिजे. १४० कोटी लोकसंख्येचा भारत प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर झाला आहे. त्यासाठी गेल्या दशकभरातील मोदी सरकारची कारकीर्द हे प्रमुख कारण ठरले. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानातील महाशक्ती म्हणून भारताचे नाव आता जगात मान्यता पावलेले आहे. भारताचा अंतराळ कार्यक्रम राष्ट्रीय प्रतिष्ठेचा तर आहेच, शिवाय तो प्रगत तंत्रज्ञानातील देशाच्या क्षमतेचे प्रतीक आहे. यासोबतच डिजिटल इंडिया उपक्रम २०२५ मध्ये नवी उंची गाठेल, फाईव्ह जी आणि सिक्स जी नेटवर्कच्या दिशेने पावले पडतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि ब्लॉकचेनमधील प्रगतीची नवी शिखरे भारताला खुणावत आहेत. या साऱ्या आश्वासक गोष्टी आहेत. मात्र, काही आव्हाने देखील आहेत.

शेती-शेतकरी, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सौहार्द आणि वातावरणातील प्रतिकूल बदल या विषयांकडे २०२५ मध्ये सरकार आणि समाजाने विशेष लक्ष घातले पाहिजे. भारत हा अद्याप कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेतीची स्थिती सुधारल्याखेरीज देशाचे अर्थकारण फार प्रगत होऊ शकत नाही. शिक्षण प्रक्रियेचे सबलीकरण व पूर्ण सामाजिकीकरण केल्याखेरीज शिक्षणाची दारे समाजातील शेवटच्या घटकांसाठी उघडली जाऊ शकणार नाहीत. आरोग्याच्या समस्या वाढत चाललेल्या आहेत. वैद्यकीय व्यवसायात नको तितका धंदेवाईकपणा आलेला आहे. त्यामुळे सरकारने आरोग्य यंत्रणा सुधारण्यावर भर दिला पाहिजे, जेणेकरून खाजगी वैद्यकीय सेवेवरील अवलंबित्व किमान पातळीवर येईल. सामाजिक सौहार्दासाठीही सरकार आणि समाजाला, विशेषतः समाज धुरिणांना विशेष प्रयत्न करावे लागतील. देवादिकांच्या नावावर भांडण-तंटे होऊ नयेत, पण ज्यांना तसे करण्याची खुमखुमी असते, त्यांना दट्ट्या देण्याची आपल्याला तयारी ठेवावी लागेल. पर्यावरणाचा तोल बिघडलेला आहे. तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की, पर्यावरणातील बदलांचा अधिक तीव्र प्रभाव २०२५ पासून जाणवायला लागेल. आताही तो कमी नाही. दिल्लीत मोकळा श्वास घेता येत नाही. वायुप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, पाण्याची टंचाई, स्वच्छता असे सर्व विषय सरकार आणि समाजाने प्राधान्यक्रमाने हाताळण्यासाठी घेतले पाहिजेत. ऊर्जा सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून सौर आणि पवन ऊर्जेची स्वीकारार्हता वाढवावी लागेल. शहरे कचरा आणि घाणमुक्त करावी लागतील. शहरांचे ढिसाळ नियोजन आणि शहरांवर येत असलेला लोकसंख्येचा ताण हा गंभीर विषय आहे. गावे राहण्याजोगी नाहीत आणि शहरांमध्ये श्वास घेता येत नाही, असा हा तिढा आहे. शेती आणि ग्रामीण उद्योग यांत प्रगती झाली तर शहरांमध्ये येणारे लोंढे थांबतील. शहरांचे नियोजन व्यवस्थित केले तर तेथे राहणे आनंददायी होईल. अर्थकारण वाढणार आहे, असा अंदाज आहे. पण, निव्वळ अर्थकारण वाढून भारताचे भागणार नाही. १४० कोटी लोकसंख्येतील प्रत्येकाला या अर्थकारणातील वृद्धीचा लाभ मिळायला हवा. बेरोजगारी संपायला हवी. भारताच्या आर्थिक विकासाचे फायदे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचतील याची सरकारने खातरजमा केली पाहिजे. गरिबी, असमानता आणि दर्जेदार आरोग्यसेवा आणि शिक्षणाचा अभाव या समस्यांवर लक्षित कल्याणकारी कार्यक्रमांद्वारे प्रभावी उपाय करणे आवश्यक आहे. महिला, दलित आणि ग्रामीण लोकसंख्येसारख्या उपेक्षित गटांवर विशेष लक्ष दिले पाहिजे. देश म्हणजे सरकार नसते. देश म्हणजे देशातील माणसं असतात. ती जितकी विचारी, संयमी आणि दूरदृष्टीची असतील, तितका चांगला देश घडत असतो. सरकार देश चालवू शकते. देश घडवण्याची जबाबदारी ही समाजाची आणि त्यातही विविध क्षेत्रांत समाजाचे, समुदायांचे नेतृत्व करणाऱ्यांची असते. ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणाऱ्यांच्या देशात किंवा बुद्धिबळात जगज्जेता ठरलेल्या बालकाच्या देशात युवकांना नोकरी नसणे किंवा बालकांना शिक्षणाच्या सोयी नसणे यापुढे तरी आपल्याला लज्जास्पद वाटले पाहिजे. त्यासाठी आग्रह धरणारी व्यासपीठे आहेत. संघटना आहेत. त्यांनी सरकारवर दबाव आणला पाहिजे आणि समाजाच्या कल्याणाचे काम करून घेतले पाहिजे. आपले अर्थकारण वाढेल. ते वाढत राहील. आपला देश जागतिक नेतृत्व करण्याच्या क्षमतेचा झाला आहे. त्याचीही प्रतिष्ठा वाढत राहील. परंतु, कोणत्याही उंचीचे स्थैर्य त्याच्या मजबूत पायावर ठरत असते. सुखी, संपन्न, समाधानी, समृद्ध समाज हा अशा प्रकारे विकसित होत असलेल्या देशाचा पाया असतो. एकविसाव्या शतकाचा एक चतुर्थांश भाग संपायला आलेला असताना, तसा देश घडवण्याच्या दिशेने नवा आरंभ करणारे वर्ष म्हणून २०२५ कडे पाहूया आणि कृतिशील होऊया. सर्वांना आंग्ल नवीन वर्षाच्या शुभेच्छा.

## प्रासंगिक

# थयथयाट करून 'आप'चा नाकर्तेपणा लपेल?

**राहुल गोखले**

नव्या वर्षाचा प्रारंभ होत असताना यंदा दोन राज्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुकांची चर्चा होणे स्वाभाविक आहे. दिल्ली विधानसभेची निवडणूक फेब्रुवारीत, तर बिहार विधानसभेची निवडणूक या वर्षीच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होऊ शकते. बिहारमधील निवडणुकीला अद्याप अवधी असला तरी दिल्लीचे वातावरण मात्र तापू लागले आहे. तेथे आम आदमी पक्षाचे (आप) सरकार २०१३ सालापासून आहे. अर्थात २०१३ साली अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेले सरकार ४९ दिवसच टिकले. कारण मुळातच ते अल्पमतातील सरकार होते. मात्र २०१५ आणि २०२० साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत 'आप'ने ७० पैकी अनुक्रमे ६७ आणि ६२ जागा जिंकून एकहाती सत्ता मिळविली. दरम्यान पंजाब विधानसभा निवडणुकीत २०२२ देखील 'आप'ने सत्ता मिळविली; ती देखील ११७ पैकी ९२ जागांवर विजय मिळवत. दिल्ली आणि पंजाब ही दोन राज्ये वगळता देशभरात अन्यत्र 'आप'ची कामगिरी सुमार राहिली आहे. साहजिकच दिल्लीची निवडणूक 'आप'साठी केवळ प्रतिष्ठेचीच नाही तर अस्तित्वाची लढाई ठरणार आहे.

गेल्या वर्षी २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत 'आप'ने दिल्लीत काँग्रेसशी आघाडी केली होती. मात्र दिल्लीतील सर्वच्या सर्व सात जागा भाजपाने जिंकल्या आणि 'आप'-काँग्रेसचा मुखभंग झाला. जेथे भाजपा उमेदवारांनी 'आप'च्या उमेदवारांना पराभूत केले तेथे विजयी उमेदवारांचे मताधिक्य ७५ हजार ते दोन लाखांच्या दरम्यान होते. तेव्हा भाजपाने 'आप'च्या उमेदवारांना दिलेली मात निर्विवाद होती यात शंका नाही. काँग्रेसशी आघाडी करूनही 'आप'चा काही लाभ झाला नाही. आता विधानसभा निवडणुकांच्या उंबरठ्यावर 'आप'ने काँग्रेसला 'इंडिया' आघाडीतूनच बाहेरचा रस्ता दाखविण्याची मागणी केली आहे. 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व काँग्रेसऐवजी ममता बॅनर्जी यांच्याकडे द्यावे असा सूर आघाडीतील घटक पक्षांकडून निघत असताना 'आप'ने त्यापुढे जाऊन काँग्रेसला आघाडीतून बाहेर काढावे अशी मागणी केली आहे. पण यात अन्य घटक पक्षांप्रमाणे काँग्रेसवर अविश्वास कमी आणि काँग्रेसपासून 'आप'ला मिळत असलेल्या आव्हानाची धास्ती जास्त आहे. 'आप' पक्ष या मागणीपर्यंत का आला हे पाहणे म्हणूनच महत्त्वाचे आहे.

२०१३ ते २०१८ दरम्यान दिल्लीत काँग्रेसचे सरकार होते. मात्र नंतर ती जागा 'आप'ने व्यापली आणि नंतर तेथील लढत प्रामुख्याने भाजपा आणि




'आप' यांच्यातच होऊ लागली. गुजरात विधानसभा निवडणुकीत (२०२२) 'आप'ने काँग्रेसच्या जनाधाराला खिंडार पाडले होते. तेथे 'आप'ची सत्ता आली नाही हे खरे पण काँग्रेसला तिहेरी लढतीचे चटके बसले. पंजाबात तेच घडले. आपल्या जनाधाराचा हिस्सा 'आप'कडून काबीज होत असल्याची जाणीव बहुधा काँग्रेस नेतृत्वाला झाली असावी. त्यामुळेच दिल्लीत काँग्रेसने 'आप' सरकारला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे आणि भाजपाशी लढत देण्यास 'आप' नव्हे तर काँग्रेस सक्षम आहे असा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. तो 'आप'च्या जिव्हारी लागणे स्वाभाविक आहे, कारण भाजपाबरोबरच आता काँग्रेसही 'आप' सरकारच्या कारभाराची लक्तरे वेशीवर टांगणार. काँग्रेसने जारी केलेल्या बारा कलमी श्वेतपत्रिकेतून भाजपावर टीका करण्यात आली असली तरी 'आप'वर दोषारोप करणे हे त्या श्वेतपत्रिकेचे खरे प्रयोजन आहे, हे लपलेले नाही. काँग्रेसचे नेते संदीप दीक्षित यांनी 'आप' सरकारच्या प्रस्तावित कल्याणकारी योजनांविषयी तक्रार केल्यांनतर नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी चौकशीचा आदेश दिला. तेव्हा 'आप'ला रोखण्यासाठी भाजपा आणि काँग्रेस एकत्र आले आहेत असा हास्यास्पद आरोप करण्यात अरविंद केजरीवाल यांनी धन्यता मानली असली तरी विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांवर त्यांनी खुलासा केला नाही. प्रस्तावित कल्याणकारी योजना अद्याप अस्तित्वात आलेल्या नाहीत. तरीही 'आप'च्या अतिउत्साही कार्यकर्त्यांनी नागरिकांकडून 'माहिती' गोळा करण्यास सुरुवात केली एवढेच नव्हे तर लाभार्थींची नोंदणीही सुरू केली; तेव्हा दिल्ली प्रशासनातील संबंधित विभागांनी योजना कार्यान्वित होण्यापूर्वीच्या नोंदणीशी आपला काहीएक संबंध नसल्याचा खुलासा केला.

काँग्रेसने जारी केलेल्या श्वेतपत्रिकेत 'आप' सरकारच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले आहेत. दिल्लीतील अनेक समस्या कशा जटिल झाल्या आहेत आणि 'आप' सरकार त्यावर तोडगा काढण्यात कसे अयशस्वी ठरले आहे याचा पाढाच काँग्रेसने वाचला आहे. अस्तित्वात नसलेल्या योजनांबद्दल जनतेची दिशाभूल केली जात असल्याची तक्रार दिल्ली युवक काँग्रेसने पोलिसांत थेट केजरीवाल यांच्या विरोधातच नोंदविली आहे. त्यामुळे केजरीवाल आणखीच बिथरले आणि त्यांनी काँग्रेसला लक्ष्य केले. पण भाजपा किंवा काँग्रेस यांच्यावर खापर फोडून 'आप' आता सहानुभूती मिळवू शकणार नाही. याचे कारण दिल्लीत गेली दहा वर्षे 'आप' सरकार सत्तेत आहे. आपला कारभार हेच खरे तर 'आप'चे निवडणुकांना सामोरे जातानाचे भांडवल हवे. त्याऐवजी भाजपावर टीका करून किंवा काँग्रेसला लक्ष्य करून 'आप' आपल्या हतबलतेचेच दर्शन घडवीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही काळात 'आप' सरकारमधील गैरव्यवहारांची चव्हाट्यावर आलेली अनेक प्रकरणे. मद्यविक्री धोरण गैरव्यवहार प्रकरणी केजरीवाल यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील काहींना तुरुंगवास घडला आहे. आताही ते जामिनावर बाहेर आहेत. मध्यंतरी केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपद सोडले आणि आतिशी यांना ते पद दिले. मात्र म्हणून केजरीवाल, सिसोदिया इत्यादींची डागाळलेली प्रतिमा धुऊन निघेल असे नाही. स्वाती मालिवाल यांना मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी, मुख्यमंत्र्यांच्या सचिवांकडून झालेल्या मारहाणीनंतर केजरीवाल किंवा 'आप'च्या नेत्यांनी मालिवाल यांना धीर देण्याऐवजी त्यांचीच बदनामी कशी होईल या स्वरूपाची विधाने केली होती. आता मालिवाल दिल्लीतील अनेक भागांत फिरून 'आप' सरकारच्या योजनांचे फसवे दावे चव्हाट्यावर आणत आहेत.

नायब राज्यपाल आपल्या प्रत्येक निर्णयात हस्तक्षेप करतात इत्यादी आरोप करून केजरीवाल यांनी सहानुभूती मिळविली. मात्र आता 'आप' सरकारमधील अनेक गैरव्यवहार उघडकीस आल्याने 'आप'ची कोंडी झाली आहे. स्वतःस आम आदमी म्हणायचे आणि मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या नूतनीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करायचे या दुट्टपीपणाशी ना नायब राज्यपालांचा संबंध ना भाजपाचा ना काँग्रेसचा. 'आप'ची स्थापना झाली तेव्हा आपला पक्ष प्रस्थापित पक्षापेक्षा स्वच्छ आणि सचोटीने काम करणारा असेल अशी ग्वाही केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली होती. दशकभरानंतर 'आप'च्या कलंकित नेत्यांनी तो दावा फोल ठरविला आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदार 'आप'कडून गेल्या दहा वर्षांचा हिशेब मागतील आणि 'तो समाधानकारक देता आला नाही तर निवडणुकीत 'आप'ला त्याची किंमत पराभवाच्या रूपाने मोजावी लागेल. काँग्रेस आणि भाजपाविरोधात थयथयाट करून आपला नाकर्तेपणा 'आप' लपवू शकणार नाही!

९८२२८२८८१९

## वेध

**गिरीश शेरेकर**

# महाराष्ट्र सौर ऊर्जा निर्मितीत आघाडीवर

पारंपरागत पद्धतीने मिळणाऱ्या विजेला सौर ऊर्जेचा सक्षम पर्याय म्हणून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने पुढे आणले आहे. परिणामस्वरूप सौर ऊर्जेच्या निर्मितीत समाधानकारक वाढ झाली आहे. २०१४ पर्यंत भारनियमनाने त्रस्त असलेल्या महाराष्ट्रात वीज उपलब्धतेचे इतके चांगले दिवस येतील, याची कल्पना देखील कोणी केली नव्हती. पण, देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ते करून दाखविले. याच काळात वीजदर वाढल्याची ओरड सातत्याने झाली. नैसर्गिक न्यायाने ती होणारच असली तरी, आता हे दर कमी होण्याचे सुतोवाच झाले आहे. कारण, कोळशासह अन्य मार्गाने जी वीज निर्मिती होते, त्यावरचा भार सौर ऊर्जेचा पर्याय मिळाल्याने कमी झाला आहे. त्यामुळेच पुढच्या तीन वर्षांत विजेचे दर कमी होतील, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी छातीठोकपणे सांगितले आहे. या संदर्भातले त्यांनी केलेले नियोजन किती परफेक्ट असेल याची जाणीव होते. गेल्या अडीच वर्षांपासून ते ऊर्जा खाते सांभाळत आहे. नव्या सरकारमध्ये हे खाते त्यांनी स्वतःकडेच ठेवले आहे. याचाच अर्थ असा की विजेचे धोरण त्यांच्या डोक्यात सुस्पष्ट आहे. सौर ऊर्जा वापरण्याचे पर्यावरणीय फायदेपण भरपूर आहेत.

केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्राने सौर ऊर्जेत चांगलीच आघाडी घेतली आहे. राज्यभरात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होईल. त्याचाच एक भाग म्हणून वाशीम जिल्ह्यातील उंबर्डा येथे ४ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प नुकताच सुरू झाला. या प्रकल्पामुळे १७११ शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार आहे. याचप्रमाणे धाराशीव जिल्ह्यातील नारंगवाडी येथे प्रकल्प सुरू झाला. एकूण ८४५ शेतकरी या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट वीज लागते. या पंपांना वीज पुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे. पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात झाले. १५, ७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६६९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यामधून १ लाख ३० हजार ४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे. उर्वरित उद्दिष्ट लवकरच पूर्ण होणार आहे. २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनांत १ लाख ८० हजार सौर पंप बसविण्यात आले. मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १ लाख ५८ हजार सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे.

सौर कृषी पंपाप्रमाणेच छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे चांगले काम राज्यात झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत वीज ग्राहकांना थेट लाभ होत असल्याने सदर योजनेची प्राधान्याने अंमलबजावणी होत आहे. छतावरील सौर ऊर्जा निर्मितीच्या बाबतीत किती घरांवर प्रकल्प बसविले व त्यातून वीजनिर्मिती क्षमता किती झाली, याबाबतीत केंद्र सरकारकडून प्रत्येक राज्याच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. महाराष्ट्राची दरवर्षी त्यात लक्षवेधी सुधारणा होत असून २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारकडून १३७ कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम मिळणे अपेक्षित आहे. राज्यामध्ये आतापर्यंत २ लाख ३७ हजार ६५६ वीज ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले आहे. त्यांची एकूण क्षमता २७३८ मेगावॅट आहे. यामध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या ८१ हजार ९३८ ग्राहकांचा व त्यांच्या एकूण ३२३ मेगावॅट क्षमतेचा समावेश आहे. या ग्राहकांना ६४७ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. या सर्व ग्राहकांचे अनुभव खूपच चांगले आहे. हजारो रुपयांच्या वीज बिलातून त्यांची सुटका झाली आहे. हे अनुभव संपर्कातल्या मंडळींना सांगितले जात असल्याने छतावर सौर ऊर्जा प्रकल्प लावण्याची स्पर्धाच सुरू झाली आहे. सरकारकडून अनुदान मिळत असल्याने दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. तो दिवस दूर नाही की, बहुतांश घरांवर सौर ऊर्जेचे प्रकल्प दिसतील. इतका चांगला प्रतिसाद असल्यानेच महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. सर्वांच्या सहकार्यातून ती कायम राहावी, हीच अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# आरती तुकाराम, स्वामी सद्गुरू धामा!

**प्रा. दिलीप जोशी**

जगद्गुरू तुकाराम महाराजांची 'आरती तुकारामा' ही आरती देखील वारकरी संप्रदायाचा प्राण आहे. अख्ख्या महाराष्ट्रात आर्त भावाने ही आरती दररोज हरिपाठानंतर आणि हरीकीर्तनानंतर म्हटली जाते.

संत तुकाराम महाराजांचे शिष्य श्री. रामेश्वर भट्ट यांनी ही अभंग आरती रचिली आहे.

इतरांच्या संतांच्या रचनेत आणि शिष्य श्री. रामेश्वर भट्टांच्या रचनेत जरा फरक आहे. कारण रामेश्वर भट्ट हे तेच धर्ममार्तंड आहेत ज्यांनी आधी संत तुकाराम महाराजांना खूप त्रास दिला, गाथा इंद्रायणीत बुडविण्यासाठी बाध्य केले. त्यानंतर जेव्हा संत तुकाराम महाराजांची सर्व अनुभूती आल्यानंतर महाराजांचे श्रेष्ठत्व अनुभवास आले. त्यानंतर त्यांनी संपूर्ण समर्पण जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या चरणी मस्तक ठेवून केले. उपेक्षा, अवमान केल्यावर खरी ओळख पटली आणि त्यायोगे मनात आर्त प्रकटून आरती तयार झाली. म्हणून त्यांची रचना म्हणजे अनुभवाचे बोल असल्याने रचनेत फरक म्हटले.

आरतीची सुरुवात त्यांनी गोड केली आहे.

*''आरती तुकारामा, स्वामी सद्गुरू धामा।''*

आरती म्हणजे सर्वभावे रति. रति म्हणजे संसार पण आरती म्हणजे भगवंताशी तद्रूप होणे, तन्मय होणे. त्या अर्थाने सुरुवात आरती या शब्दाने केली. दुसरा शब्द तुकारामा आहे.

महाराजांचे तुकाराम हे नाव देखील पूर्वसंचितानुसार ठेवले असावे. भगवान श्रीरामाच्या जीवनाला तुकलेले म्हणून तुकाराम. तुक म्हणजे वजन किंवा तुला. तुलनेने किंवा ज्ञानवजनाने भगवान रामाच्या समकक्षेत असल्याने तुकाराम. श्रीरामचंद्र भगवंताच्या सद्गुणांनी व्याप्त होऊन रममान होणारे म्हणून तुकाराम. म्हणून तर म्हणतात ''तुकी तुकला तुकाराम.''

रामेश्वर भट्ट का आरती करतात? कारण ते स्वामी आहेत, ते सद्गुरू आहेत आणि निजधामी आहेत.



स्वामी म्हणजे मालक. संत तुकोबाराय मनाचे मालक, इंद्रियाचे मालक होते म्हणजे त्यांचा ताबा मनावर, इंद्रियांवर होता इतकेच काय त्यांची मालकी नियतीच्या फेऱ्यावरही होती म्हणून ते स्वामी.

सद्गुरू म्हणजे अज्ञानाचा नाश करणारे, ज्ञानाचा प्रकाश देणारे आणि देवादिकांकडून पुजिले जाणारे. स्वामी सद्गुरू म्हणजे इंद्रियाचे मालक असणारे ज्ञानी. देवत्वाचा मार्ग देणारे.

धाम म्हणजे ईश्वराचे निवासस्थान. सद्गुरू म्हणजे भगवंतांचे स्थानच म्हणून ते स्वामी, सद्गुरू, धामा आहेत. पुढे रामेश्वर भट्ट म्हणतात,

*''सच्चिदानंद मूर्ती, पाय दाखवी आम्हा!''*

सच्चिदानंद म्हणजे परब्रह्म परमात्मा. तो कसा आहे? तो सत् चिद् आनंद स्वरूप म्हणजे तो निर्गुण, निराकार आहे. म्हणजे तो अमूर्त आहे.

संत तुकाराम महाराजांचा देह हा सामान्य देह नाही. त्यामुळे तो निर्गुण, निराकार, अमूर्त परमात्मा भूतलावर सगुण साकार, मूर्त रूप घेऊन संत तुकाराम महाराज रूपाने प्रकट झाला. म्हणून गोड शब्द रामेश्वर भट्टांनी वापरला तो म्हणजे 'सच्चिदानंद मूर्ती' आहे.

खरं सांगायचे तर जो सच्चिदानंद आणि अमूर्त असतो तो म्हणजे परब्रह्म परमात्मा. जो सच्चिदानंद नाही आणि मूर्त आहे तो म्हणजे आपण सामान्य जीव.

जे सच्चिदानंद असून मूर्त आहेत ते म्हणजे संत असतात. म्हणून तुकाराम महाराज 'सच्चिदानंद मूर्ती' आहेत.

'पाय दाखवी आम्हा'' हा व्यापक शब्द आहे. जगात पहावे, दर्शन घ्यावे असे पायच नाहीत. असतील तर ते पाहण्यासाठी आपला अधिकार आणि भाग्य नाही. म्हणून तर रामेश्वर भट्ट संत तुकाराम महाराजांना पाय दाखवा ही विनंती करतात. कारण पाय सहज दिसतील असा माझा अधिकार नाही.

दुसरे म्हणजे अजूनही खेड्यापाड्यात मोठ्या माणसांचे दर्शन घ्यायचे असेल तर 'पाय दाखवा' म्हणायची पद्धत आहे.

अमूर्त परब्रह्म मूर्त होऊन आले म्हणून सच्चिदानंद मूर्ती पाय दाखवी आम्हा म्हटले आहे.

*राघवे सागरात, पाषाण तारिले।*
*तैसे तुकोबाचे अभंग रक्षिले!*

भगवान श्रीरामचंद्रांनी सेतू बनविताना दगड पाण्यावर तरंगले होते. उपमेयाला तुल्यबळ उपमा देणे गरजेचे म्हणून हाच दृष्टांत रामेश्वर भट्टांनी दिला. ही उपमा देताना इंद्रायणीच्या डोहात बुडविलेले अभंग तरण्याचे सामर्थ्य श्रीरामचंद्र भगवंताप्रमाणेच संत तुकाराम महाराजांमध्ये होते. एका अभंगात रामेश्वर भट्टच म्हणतात की, ''तुका विष्णु नाही दुजा.'' म्हणजे भगवान राम आणि जगद्गुरू तुकाराम हे वेगळे नाहीच.

अभंग तरणे म्हणजे जड जीवांना भवसागरात बुडण्यावाचून तारणे होय.

*तुकीता तुलनेशी ब्रह्म तुकाशी आले।*
*म्हणोनी रामेश्वरी, चरणी मस्तक ठेविले!*

तुकीता तुलनेशी म्हणजे पारड्यात वजन करणे, तुला करणे, तुलना करणे. तुला कोणाशी? तर एका पारड्यात ब्रह्म ठेवले आणि दुसऱ्या पारड्यात जगद्गुरू तुकाराम महाराजांना ठेवले. तर पारडे बरोबरीत समतुल्य आले. हा अधिकार संत तुकाराम महाराजांचा आहे. म्हणून मी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले आहे.

हा आरतीचा अभंग ज्या रामेश्वर भट्टांनी लिहिला त्यांनी महाराजांना भयंकर ताप दिला होता, पण अनुभूती येताच ते त्यांचे दास झाले.


संत तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यांची नावे उपलब्ध आहेत त्यात रामेश्वर भट्टांचे नाव अग्रक्रमावर आहे. ते रामेश्वर भट्ट नितांत श्रद्धेने स्पष्ट सांगतात ''तुकाराम तुकाराम, नाम घेता कापे यम।''

म्हणून त्यांची ही आरती सार्थ शब्दात त्यांनी लिहिली.

९८२२२६२७३५

## रोहित-विराटला टाटा बाय बाय

'आम्ही जिंकण्याचे मार्ग शोधण्यात कमी पडलो : रोहित शर्मा' ही बातमी वाचून हसावे की रडावे तेच कळले नाही. न्यूझीलंड दौऱ्यातील मानहानिकारक पराभवानंतर आता ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील भारतीय संघ पराभवाच्या खाईत गेला आहे. प्रत्येक सामन्यानंतर कर्णधार म्हणून रोहित शर्मा पत्रकार परिषदेत करत असलेली मखलाशीही संतापजनक आहे. असे झाले म्हणून आम्ही हरलो हे सांगायला कर्णधार कशाला हवा? थोडेफार क्रिकेट समजणाऱ्या सर्वांनाच ते कळते. गेल्या बऱ्याच महिन्यांपासून रोहित शर्मा स्वतः आणि विराट कोहली या दोघांचाही सूर कमालीचा हरपलेला आहे. एखादा नवखा खेळाडू खेळावा तसे ते दोघेही खेळपट्टीवर बाद होण्यासाठी धडपडत असल्यासारखे 'खेळत' असतात. त्यांना आणखी किती वर्षे खेळवणार आहे बीसीसीआय? नवीन खेळाडूंना वाव देण्यासाठी, आता काही वरिष्ठ खेळाडूंना, त्यांच्या पूर्वपुण्याईवर, सतत खेळवत ठेवणे हे उदयोन्मुख खेळाडूंवर अन्याय करण्यासारखे आहे. तेव्हा या जोडगोळीला 'टाटा-बायबाय' करण्याची वेळ आली आहे आणि त्याची गरजही आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

## शेतकऱ्यांची चिंता कोण करेल?

आधीच महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याना नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण, पूर, पीकविमा, खराब शेतरस्ते, हवामान बदल यामुळे ते ग्रस्त आहेत. अशात शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला बाजारभाव नाही, उभ्या पिकांवर शेतकरी नांगर फिरवतो आहे. त्यातच आता वाढणाऱ्या रासायनिक खतांच्या किमतीमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्याना सतावत असतानाच नवीन वर्षात रासायनिक खतांचे भाव दहा ते वीस टक्क्यांनी वाढणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. विविध रासायनिक खत निर्मितीकरिता फोस्फेट रॉक, फोस्फोरिक ॲसिड, अमोनिया, नायट्रोजन, पोटॅश, सल्फर, झिंकसारख्या कच्च्या मूलभूत घटकांच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढल्याचे कारण खत कंपन्या सांगत आहेत. सरकारकडून खत कंपन्यांना यासाठी सबसिडी सुद्धा दिली जाते, त्याचप्रमाणे खत खरेदी करताना शेतकरी पाच ते अठरा टक्के जीएसटी सुद्धा भरतो. अलिकडे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सबसिडीचे प्रमाण कमी केले आहे. सदर दरवाढीचा फायदा कंपन्यांना होताना दिसतो. शेतकऱ्यांच्या या आर्थिक लूटमारीत सरकार सहभागी असल्याचे दिसून येते. मायबाप सरकारला विनंती आहे की फुकट आणि मोफत योजनांवर अंकुश लावून, शेतकऱ्यांच्या भल्याचा विचार करावा. खतांवरील जीएसटी कमी करून सबसिडी वाढविण्याचा विचार व्हावा तरच शेती तग धरेल अन्यथा शेतकरी आत्महत्यांचा आलेख वाढतच राहणार. पशुधन कमी झाल्याने शेतकऱ्यांकडे सेंद्रिय खतांचा पर्याय सुद्धा राहिला नाही, जैविक खत निर्मिती शेतकऱ्यांना परवडणारी नाही. शेतमजूर मिळत नाही, मिळाले तर मजुरी महाग आहे. अशा चक्रव्यूहात शेतकरी सापडला आहे, त्याला जिवंत ठेवा, हीच विनंती.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

●● ●●

## नवीन वर्षातील नव्या आकांक्षा

आज नव्या वर्षाची सुरुवात होत असताना काही समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. आपण ज्या लोकशाहीवादी देशात राहतो तिथे सामान्य माणसाला अजूनही आपल्या अनेक गरजा पूर्ण करता आलेल्या नाहीत. परंतु लोकांमधला आशावाद प्रचंड भक्कम स्वरूपाचा दिसून येतो. लोकशाही कार्यपद्धती वापरून आणि तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून आपल्यासाठी उपलब्ध असलेला काळ आपल्याला प्रबळ करेल याबद्दल जनमानसामध्ये मोठा आत्मविश्वास दिसून येतो. काळ कोणासाठी थांबत नाही. परंतु हातात असलेला काळ वाया जाऊ द्यायचा नाही, त्याचे संधीत रूपांतर करून काहीतरी घडवून दाखवायचे अशा शक्तीचे जागरण या वर्षांमध्ये होऊ शकते. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजेच २००१ साली जन्माला आलेला या दशकातील युवक या एकविसाव्या शतकातील आपल्या वयाची पंचवीस वर्षे पूर्ण करेल. त्याच्यासाठी हा काळ सर्वाधिक संस्मरणीय ठरू शकतो. विसाव्या शतकात या देशातील समाजाने अनेक गोष्टी प्रदीर्घ काळ सहन केल्या त्या आता इतिहासजमा झाल्या आहेत. नव्या तंत्रज्ञानाने आता नवा इतिहास घडवायला सुरुवात केली आहे. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे की हे तंत्रज्ञान केवळ सुखासाठी नाही तर ते सर्वार्थाने सर्वांच्या सुरक्षिततेसाठी आहे. येणारा काळ आपल्याला सुखी करेलच हे सांगता येत नाही. पण त्याने सुरक्षित केले किंवा ठेवले तर ती तितकीच मोठी देणगी ठरू शकते. या सगळ्या आकांक्षासह नव्या वर्षाचे स्वागत होत आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सहकारमंत्री पाटील व आ. बनसोडे यांच्या नागरी सत्काराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ जानेवारी -**

उदगीर-जळकोट विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या व सर्व समस्त नागरीकांच्या वतीने राज्याच्या सहकारमंत्री पदी निवड झाल्याबद्दल बाबासाहेब पाटील व उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री आ. संजयजी बनसोडे, माजी मंत्री, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. रमेश कराड, आ. अभिमन्यू पवार, माजी आ. गोविंदराव केंद्रे, अध्यक्ष (स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार मंडळ म. राज्य) या सर्व मान्यवरांचा सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर सह. अध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान समिती, श्रीक्षेत्र पंढरपूर यांच्या शुभहस्ते शनिवार दि.४ जानेवारी रोजी उदगीर शहरातील विद्यावर्धिनी हायस्कुल येथे सायं. ५ वाजता जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला आहे.



तरी या सत्कार सोहळयास आपण उदगीर व जळकोट तालुक्यातील नागरीकांनी उपस्थित राहुन मान्यवरांचा आनंद द्विगुणीत करावा, असे आवाहन नागरी सत्कार सोहळा समिती उदगीरच्या वतीने करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**औसा, दि.१ जानेवारी -**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय परिपत्रक यानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन करण्यात आले. अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांच्या हस्ते लाल फीत कापून ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व वाचकांना अभ्यासक्रमाशिवाय इतर पुस्तकाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या रूपाली गिरी, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. माधुरी पोलकर, प्रा. शबनम शेख, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे, एस.एन. गायकवाड, शेबिर शेख आदी शिक्षक शिक्षकेतर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महात्मा गांधी महाविद्यालयात वाचन संकल्प कार्यशाळा

**अहमदपूर, दि.१ जानेवारी -**

येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, भाषा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागमार्फत वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्त दि.१ जानेवारी रोजी ग्रंथ प्रदर्शन व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. याप्रसंगी विचार विकास मंडळाचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट किशनरावजी बेंडकुळे, सहसचिव सुरेश देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर. शेळके उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अॅड. बेंडकुळे यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमी वापर करून पुस्तक वाचनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. बौद्धिक ज्ञान वाढवण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे आरोग्यावर अनेक वाईट परिणाम होत आहेत. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. शेळके यांनी उपक्रमाची पार्श्वभूमी व हेतू स्पष्ट करून पुस्तक वाचनामुळे माणसाचे मस्तक सशक्त होते, असे प्रतिपादन केले. या कार्यशाळेला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर. डी. गुळवे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिल कांबळे यांनी केले तर ग्रंथपाल डॉ.एस.आर. सुळसुळे यांनी आभार मानले.



### आर.सी. स्वामी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव सोहळा

**वलांडी, दि.१ जानेवारी -**

देवणी तालुक्यातील दवणहिप्परगा येथील रहिवाशी राचोटी चंद्रया स्वामी हे सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने त्यांना मुंबई येथील म्हाडाचे कार्यालय गृहनिर्माण भवन कलानगर बांद्रा पूर्व मुंबई येथे मंगळवारी सपत्नीक कुटुंबासह सत्कार करून निरोप देण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी म्हाडा कोकण मंडळाचे मुख्याधिकारी रेवती गायकर हे होते. मंचावर मुख्यअभियंता पंदीरकर, मुख्यअभियंता आडे, मुख्यअभियंता अंकलगी, कार्यकारी अभियंता भदाणे, लातूर येथील सेवालय संचालक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. रवी बापटले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुंबईचे उपाभियंता लातूरचे ओमप्रकाश पाटील, मुख्याध्यापक संजय विभुते, भारतीय वायुदलात जामनगर येथे कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता प्रशांत स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या वतीने आर.सी. स्वामी यांच्या २३.५० वर्ष कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी म्हाडा विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### सहकार मंत्र्यांच्या हस्ते पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**औसा, दि.१ जानेवारी -**

विद्यार्थ्यांची जडण घडण व्यवस्थितपणे करता यावी. यासाठी ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांना दैनंदिन परिपाठात उपयुक ठरणाऱ्या औसा तालुका शिक्षक पतसंस्थेच्या शैक्षणिक दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्राचे नवनियुक्त सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, व्हा. चेअरमन हरिश आयतनबोने, चाकुर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन शरद हुडगे, आदर्श शिक्षक प्रमोद हुडगे, संचालक महेश कांबळे, संजय रोडगे, दिपक डोंगरे,राजू जाधव, रविंद्र शिंदे, ज्ञानेश्वर तोडकरी उपस्थित होते.

# टाळ मृदंगाच्या गजरात आ. अभिमन्यू पवारांच्या पदयात्रेचे जंगी स्वागत

**जेसीबीच्या साह्याने फुलांचा वर्षांव; हजारोच्या जनसमुदाचा सहभाग... अर्चनाताई पाटील यांचा रॅलीत सहभाग...**





**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ जानेवारी -**

राज्याच्या कल्याणासाठी महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर यावे आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हावे. यासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी तुळजापूरची आई तुळजाभवानीच्या चरणी नवस केला होता. तो नवस पुर्ण झाल्याने बुधवार दि.१ जानेवारी रोजी सकाळी औसा येथून कार्यकर्त्यांसह हजारो नागरिकांनी नवसपूर्ती पदयात्रेत सहभाग घेतला. टाळ, मृदंगाच्या गजरातील पदयात्रेचे ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. तर जेसीबी च्या साह्याने पदयात्रेवर गावकऱ्यांनी फुलांचा वर्षांव केला.

बुधवारी सकाळी ७ वाजता आ. अभिमन्यू पवार यांच्या औसा येथील निवासस्थानापासून पदयात्रा निघाली. पालखी रस्त्याने बोरफळ येथे पदयात्रा आल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने पदयात्रेचे स्वागत करण्यात आले. यानंतर शिवलीमोड व शिदांळा (लो) याठिकाणी महिलांनी आमदार अभिमन्यू पवार यांचे औक्षण करून पदयात्रेचे स्वागत केले. पदयात्रा बेलकुंड येथे आल्यानंतर पदयात्रेचे स्वागत जेसीबीच्या साह्याने फुलांचा वर्षांव करण्यात आला. तर टाळ मृदंगाच्या गजरात पदयात्रेचे स्वागत वारकरी संप्रदायाने केले. क्रेनच्या साह्याने हार उभा करून आमदार अभिमन्यू पवारांचे जंगी स्वागत करण्यात आले.

तावशीताड, काजळे चिंचोली, वांगजी व आशीव याठिकाणीही पदयात्रेचे जंगी स्वागत भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

या पदयात्रेत आ. अभिमन्यू पवार यांनी टाळ मृदंगाच्या गजरात भजनी मंडळांसह वारकरी सांप्रदायातील ताल ठरला.

बुधवारी पदयात्रा औसा ते आशीव २२ किलोमीटरचे अंतर पार करीत आशीव येथे मुक्कामी सायंकाळच्या सुमारास थांबली. रात्री शिवशाहीर संतोष साळुंके यांचा शिवचरित्र पोवाडा व स्फुर्तीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी सकाळी नवसपुर्ती पदयात्रा तुळजापूरच्या दिशेने निघणार आहे.

### सहकारमंत्री पाटील व अर्चनाताई पाटील चाकूरकरांनी सहभाग नोंदविला...

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी बेलकुंड येथे पदयात्रेत सहभाग नोंदवित आमदार अभिमन्यू पवार यांना शुभेच्छा दिल्या. तर औसा येथून निघालेल्या पदयात्रेत भाजपच्या अर्चना पाटील-चाकूरकर या औसा शहरात सहभागी होत आमदार अभिमन्यू पवारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने पदयात्रेत भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते.

## आरीमोड येथे सरपंच संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१ जानेवारी -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील लोकनियुक्त सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी सरपंच संघटनेच्या वतीने शिवसेनेचे तालुकाध्यक्ष तथा आनंदवाडी येथील सरपंच भागवत वंगे यांनी केली आहे.

यांना देवून शिरूर अनंतपाळ तालुका सरपंच संघटनेच्या वतीने आरी मोड येथे आज रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यात सहभागी शिवसेना तालुकाध्यक्ष भागवत वंगे, दिलीप पाटील, अनिल शिंदे, इंद्रजीत माने, शेख माजीद, अशोक बेलुरे, व्यंकट कल्ले, गिरीधर कल्ले, शेख नबीसाब, संजय बिराजदार, मदन सुर्यवंशी, प्रभाकर चामले, ज्ञानेश्वर पाटील, मुळजे बाळु, नारायण पवार, गोविंद श्रीमंगल, सरोजा गायकवाड, यासह शिरूर अनंतपाळ, थेरगाव, रापका, आरी, लक्कडजवळगा, शिवपुर, गणेशवाडी, कांबळगा, आनंदवाडी, तुरुकवाडी, भिंगोली, उमरदरा, कासलेवाडी, बेवणाळ, हालकी, कळमगाव व तालुक्यातील असंख्य जनसमुदाय उपस्थित होता.

## आत्मा अंतर्गत हरभरा टोकन शेती शाळेच्या तिसऱ्या वर्गाचे आंबेगाव येथे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१ जानेवारी -**

तालुक्यातील अबेगाव येथे प्रकल्प संचालक कार्यालय आत्मा कार्यालय लातूर यांच्या वतीने एस.व्ही. लाडके आणि उपप्रकल्प संचालक आत्मा बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे व मंडळ कृषी अधिकारी अश्विनी पाटील देवणी यांच्या नियोजनाने आंबेगाव येथील प्रगतिशील हरभरा टोकन शेतकरी सचिन पाटील यांच्या प्रक्षेत्रावरती रब्बी हंगामातील हरभरा टोकन या विषयावर तिसऱ्या सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

प्रसंगी ए.एस. इनसुरे यांनी शेतकऱ्यांनी हरभरा उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान अवलंबावे यामध्ये हरभरा टोकन, ऊस हरभरा आंतरपीक, सरी वरती हरभरा लागवड, इत्यादी माध्यमातून उत्पन्न वाढवावे आणि अशी विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या कृषी खात्याच्या योजनांचे सविस्तर सखोल मार्गदर्शन केले. आत्मा विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असलेल्या विविध पिकांवरती हंगामनिहाय शेती शाळा या शेतकऱ्यांसाठी ज्ञानाचे भांडार आहेत. कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र प्रगतिशील पुरस्कार प्राप्त शेतकरी व कर्मचाऱ्यांचे उत्कृष्ट ज्ञान या सर्वांचे सर्वोत्कृष्ट एकत्रित ज्ञान शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावरती सुलभ प्रकारे उपलब्ध होते व त्या माध्यमातून शेतकरी तांत्रिक दृष्ट्या वेगवेगळ्या पिकांच्या बाबतीत शेतीपूरक व्यवसायाच्या बाबतीत तांत्रिक दृष्ट्या सक्षम होऊन उत्पन्न आणि उत्पादन वाढीकडे वाटचाल होण्यास सुलभ होते, असे प्रतिपादन केले.

तसेच हरभरा पिक सध्या ४५ ते ६० दिवसांचे असून पीक अवस्था ही कुठे फलोरा मध्ये असून काही ठिकाणी पाच ते दहा टक्के घाटा अवस्था आहे. अशा स्थितीमध्ये शेतकऱ्यांनी घडलेली नियोजन करणे महत्त्वाचे असून आंतरप्रवाही कीटकनाशक वाढीसाठी टॉनिक व एक बुरशीनाशक या संमिश्र औषधाची फवारणी करण्याची शिफारस केली.

याप्रसंगी गावचे उपसरपंच व्यंकटराव शिंदे, माया श्रीनामे, प्रगतिशील शेतकरी दत्ताजी काकनाळे, व शेतकरी गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहमदपूर येथे रंगले बहारदार कवी संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१ जानेवारी -**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुरोगामी साहित्य परिषद, संवाद ग्रुप, मिथुन चक्रवर्ती क्लब अहमदपूर यांच्यावतीने दारू सोडा दूध प्या हा संदेश समाजाला देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजी देशमुख हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चांदबा पाटील हे उपस्थित होते.

याप्रसंगी शिवाजीराव देशमुख यांनी असे सांगितले की, दारू ही वेभीचाराची जननी आहे. दारू पिणारा माणूस कोणतेही वाईट काम करायला मागे पुढे बघत नाही म्हणून दारू मुक्त समाज निर्माण होणे ही काळाची गरज आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर भालेराव यांनी केले. या कार्यक्रमानंतर अनंत काशीकर यांच्या अध्यक्षतेखाली बहारदार कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कवी संमेलनामध्ये शाहीर सुभाष साबळे, बी.व्ही. मुंडे, अनंत काशीकर, गारपीट कार प्राध्यापक भगवान अमलापुरे, लोकशाही कार एन.डी. राठोड, डॉ. शादुल्ला पठाण यांनी आपल्या कविता सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. शाहीर सुभाष साबळे यांनी माणसा इथे मी तुझे गीत गावे या कवितेचे पहाडी आवाजात गायन केले. कवी बी व्ही मुंडे यांनी शब्दांनो ही कविता सादर केली तर अनंत काशीकर यांनी जुळणी ही कविता सादर करून प्रेक्षकांची दाद घेतली. संविधानाचा जागल्या ही कविता प्राध्यापक भगवान अमलापुरे यांनी सादर केली.

डॉ. शादूला पठाण यांनी सर्वधर्मसमभाव ही कविता सादर करून प्रेक्षकांकडून वाहवा मिळवली.

## रामलिंग मुदगड येथे सुश्राव्य संगीतमय शिवपुराण कथा व भव्य यात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ जानेवारी -**

तालुक्यातील रामलिंग मुदगड येथील श्री देवाजीबाबा धर्माधिकारी यांच्या ४७८ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे शुक्रवार दि.३ जानेवारी पासून दि.७ जानेवारीपर्यंत श्री गुरु परमहंस परिव्राजकचार्य श्री.श्री. हरिहरानंद भारती स्वामीजी धारुरकर यांचे भव्य सुश्राव्य संगीतमय शिव पुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. मंदीर जिर्णोध्दार व भुमी पुजन व कालिका प्राण प्रतिष्ठा, श्रींची पालखी मिरवणुक सोहळा पुरंत व धर्म सभा आदी धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. तर सोहळा शुक्रवार ३ पासून मंगळवार ७ पर्यंत दररोज रात्री ७ ते ९ श्री गुरु परमहंस परिव्राजकचार्य श्री.श्री. हरिहरानंद भारती स्वामीजी धारुरकर यांचे शिवपुराण कथा होणार आहे. तरी परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवाजीबाबा धर्माधिकारी संजीवन समाधी मंदिर समिती वतीने करण्यात आले आहे.

## निलंग्यात इज्तेमासाठी मुस्लिम बांधवाची गर्दी; अनेकांन मान्यवरांनी दिल्या भेटी



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ जानेवारी -**

आजच्या धकाधकीच्या युगात माणसातील माणुसकी, प्रेम, बंधुभाव लोप पावत आहे. प्रत्येकाने प्रेम व माणुसकी जोपासणे आवश्यक असून, विश्वशांतीची गरज आहे. मानव कल्याणासह विश्वशांती, राष्ट्रीय एकात्मता आणि भाईचाऱ्यांचा संदेश देण्याबरोबर कुरआनच्या शिकवणीचा प्रसार व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. पवित्र कुराण जीवन जगण्यासाठी असून पवित्र ग्रंथ कुराण हे फक्त मुसलमानांसाठी नव्हे तर संपूर्ण मानवजाती आहे. इस्लाम धर्म हे भाईचारा व शांतीचा संदेश देणारे असून इस्लाम धर्माच्या अनुयायीनी शेवटचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी सांगितल्याप्रमाणे आपले आचरणात आणून त्याचे पालन करावे, असे आव्हान निलंगा येथे आयोजित इज्तेमात दुसऱ्या दिवशी जोहर, असर व मगरीबच्या नमाज नंतरच्या बायन प्रवचनमध्ये करण्यात आले.

मंगळवारी दुवाच्या वेळेपर्यंत अधिक जिल्ह्यातील समाजबांधवांनी उपस्थिती लावली. निलंगा शहरापासून इज्तेमास्थळापर्यंत जागोजागी स्वयंसेवक उभे आहेत. प्रत्येक वाहनधारकांना मार्ग दाखविण्याचे काम करीत सावकाश जाण्याचा सल्ला देणारे तरुण प्रेम आणि आपुलकी दाखवित होते. इज्तेमास्थळी दोन ठिकाणी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने वाहनांची पार्किंग करण्यात आली आहे. शिवाय, उपस्थित बांधवांना अत्यंत माफत दरात दर्जेदार जेवणाची व्यवस्थाही करण्यात आली होती.

शिवाय, इज्तेमास्थळी घेऊन जाण्यासाठी निलंगा शहरातील बसस्थानक, उदगीर मोडपासून मोफत सोय करण्यात आली आहे. सोमवारी सकाळपासून इस्लामचे अभ्यासक, धर्मगुरू कुरआन, हदीसवर बयाण (प्रवचन) करीत होते.

### दवाखाना, रुग्णवाहिकेची सोय...

इज्तेमास्थळी दोन दवाखने सुरू करण्यात आला होती. शिवाय, रुग्णवाहिकांची व्यवस्था केली आहे. याठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरही सेवा देत होते. हजारो नागरिक उपस्थित असतानाही कोणालाही त्रास होणार नाही, यासाठी शेकडो स्वयंसेवक काळजी घेण्याचे काम केले.

### मिठाई, कपडे, अत्तरांचा सुगंध...

इज्तमास्थळी विविध प्रकारच्या खजूर, मिठाई, उबदार कपड्यांची अनेक दुकाने लावण्यात आली आहेत. शिवाय, अत्तर, सुरमा, टोपी, मिस्वाकचीही दुकाने थाटली होती.

### मान्यवरांनी दिल्या भेटी...

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, प्रदेश काँग्रेस सचिव अभय साळुंके राष्ट्रवादी, युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, आदींनी भेटी दिल्या.

# हिवरा बुद्रुकच्या श्रावणीची राष्ट्रीय इंडियन मिलीटरी कॉलेजमध्ये निवड

## राज्यातील दुसरीच विद्यार्थीनी, जिल्हाधिकाऱ्यांचेहस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

हिंगोली जिल्ह्यातील हिवरा बुद्रुक येथील विद्यार्थीनी श्रावणी सारंग गोदरे हिची राष्ट्रीय इंडियन मिलीटरी कॉलेज डेहराडून साठी निवड झाली आहे. या परिक्षेत राज्यातून आतापर्यंत दोनच विद्यार्थीनींची निवड झाली असून यामध्ये श्रावणीचा समावेश आहे. तिच्या निवडीबद्दल जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी तिचा पालकांसह सत्कार केला.

हिवरा बुद्रुक येथील श्रावणी हिने सैन्य दलात मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगले आहे. त्यासाठी तिने या परीक्षेची तयारी सुरू केली होती. अतिशय कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेतून पूर्ण देशातून फक्त ३० विद्यार्थी निवडले जातात. सदर परीक्षा मिनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा समजली जाते. महाराष्ट्र राज्यातील आतापर्यंतची श्रावणी ही केवळ दुसरी मुलीगी आहे. यापूर्वी गंगाखेडची आदिती विष्णू शिंदे हिची निवड झाली होती. यावेळी निवड झालेल्या देशातील पाच मुलींमध्ये श्रावणीची निवड झाली आहे. लेखी, तोंडी आणि वैद्यकीय चाचणी या तीन टप्प्यामधून झालेल्या चाचण्यांमधून तिने हे यश मिळवले आहे. तिच्या यशात आयकॅन कोचींग क्लासेस सातारा येथील अदिती गावंडे आणि सुखोई अकॅडमी दिल्लीचा महत्वाचा वाटा आहे.

हिंगोली जिल्ह्याचा नावलौकीक करणाऱ्या श्रावणीचा जिल्हाधिकारी अभिवन गोयल यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के, गटविकास अधिकारी प्रदीप बोंढारे, गटशिक्षणाधिकारी दत्ता नांदे, विस्तार अधिकारी बालाजी गोरे यांची उपस्थिती होती.

अभ्यासाचे कोटेकोरपणे नियोजन, सातत्याने वेळापत्रकाप्रमाणे अभ्यास केल्यामुळे हे यश मिळाल्याचे तिचे वडील सारंग गोदरे, स्वामी आणि आई सारीका स्वामी यांनी सांगितले. सैन्यदलात उच्चपदस्थ अधिकारी होण्याचे तिचे स्वप्न पूर्ण होणार आहे. तिच्या यशाबद्दल हिंगोली जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील व्यक्तींनी तिचे अभिनंदन केले आहे.

# कै. विठ्ठलराव घुगे विद्यालयात आनंद नगरीचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

गंगा नगर भागातील कै. विठ्ठलराव घुगे विद्यालयात बुधवारी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे सचिव शिवशंकर घुगे यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य, व्यवहारज्ञान, सहकार्याची भावना आणि स्वावलंबन अशा विविध बाबींचे धडे मिळाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव शिवशंकर घुगे होते प्रमुख अतिथी मंदाकिनी शिवशंकर घुगे या उपस्थित होत्या. आनंद नगरी कार्यक्रम शाळांमध्ये का राबवला जातो. त्याचा उद्देश काय हे संस्थेचे सचिव शिवशंकर घुगे यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यापार व बाजार विक्री व खरेदी याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना विविध पदार्थ, वस्तू आणि खेळाच्या माध्यमातून, विक्री आणि खरेदीचा अनुभव घेण्याची संधी दिली जाते. या उपक्रमामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक सामूहिकपणे सहभागी होतात. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य, संघभावना आणि पैसे व्यवस्थापन यासारख्या गोष्टीही शिकवण्यासाठी आयोजित केल्याचे सांगितले. यात विद्यार्थ्यांचा सहभाग, शिक्षकांची मदत, आर्थिक शिक्षण, मनोरंजन आणि संस्कृतीचा वारसा या सर्व गुणांचे परिपोषण विद्यार्थ्यांमध्ये होते, असे त्यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमात अनेक खाद्यपदार्थांची मेजवानीची पर्वणी होती. विद्यार्थ्यांनी त्यांच्या परीने, कलेने व आवडीनुसार वेगवेगळे खाद्यपदार्थ, खेळाच्या वस्तू बनवून आणल्या होत्या. इतर विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांकडून खाद्यपदार्थ, विविध वस्तू खरेदीचा आनंद घेतला.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक अर्धापूरकर, श्रीमती पतंगे के आर, श्रीमती चंद्रवंशी आर.ए. श्री घुगे एस बि, श्रीमती धुमाळे एस बि, पतंगे जि पि, दराडे एस एम, सोनवणे एन आर, इघारे वाय बी, नागरे जि एल, श्रीमती कोट्टी एस व्हि, इंगळे एस एल, श्रीमती कट्टेकर एस आर उबाळे एस एस, श्री हलगे जि एस, श्रीमती चेंडके एम पी , मुळे ए .ए,. कुलकर्णी, जाधव गणेश, गायकवाड, शेवाळे, शिक्षक व शिक्षकेतर आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शिवाजी महाविद्यालयात रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

येथील शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षानिमित्त व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. शिवाजीराव पवार यांचा सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. किशोर इंगोले म्हणाले की, समाजाचे उत्तरदायित्व म्हणून आपण सर्वांनी नियमित रक्तदान केले पाहिजे. रक्ताच्या पिशवीला ठराविक मुद्दत असते रक्ताचा तुटवडा असो किंवा नसो असाध्य रोगावर किंवा ठराविक व्याधींसाठी ताजे रक्त व पेशी आवश्यक असतात. हंगामी विषाणूजन्य आजार, चक्रीवादळासारख्या हवामान चलित आपत्ती, वातावरणातील बदल, आजारांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे रक्ताचा तुटवडा दूर करता येतो. यावेळी २७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. विचारमंचवर शिवाजीराव पवार, संस्थेच्या अध्यक्षा सौ. मंदाताई पवार, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. प्रल्हाद शिंदे, संस्थेचे सहसचिव प्रणव पवार, संस्थेचे सदस्य प्रभाकर पारीसकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, रक्त संकलन अधिकारी डॉ. स्वाती गुंडेवार सी जे लोंढे, डॉ. सुनील कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. आशिष इंगळे मुख्याध्यापक रतन भोपाळे, प्रा. देवानंद येवले, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या अधीक्षक श्रीमती प्रतिभा पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे तर आभार प्रदर्शन प्रा. संजय चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षकवृंद, प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली– तालुक्यातील श्री संत नामदेव यांचे जन्मस्थान असलेल्या नर्सी नामदेव येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा वर्धापन दिनानिमित्त रामकथा ज्ञानयज्ञ ज्ञानेश्वरी पारायण, किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. बुधवारी हभप नामदेव महाराज लबडे यांच्या मधुर वाणीतून रामकथा ऐकण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत कौशल्य कार्यशाळा व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन



हिंगोली– वाचन संकल्प महाराष्ट्राचाउपक्रमाअंतर्गत शासकीय जिल्हा ग्रंथालयात वाचन कौशल्य कार्यशाळेचे, सामुहिक वाचनाचे व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्धाटन आज जिल्हा सांख्यिकी उपसंचालक एस. एम. रचावाड यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

यावेळी सहायक संशोधन अधिकारी ए. ए. करेवार, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, विभागीय ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह संतोष ससे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक, मिलिंद सोनकांबळे, शंभोनाथ दुभळकर, दिगांबर झुंजारे, फारुक शेख, ग्रंथालय पदाधिकारी व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी वाचनाचे महत्व, वाचन कौशल्य कसे विकसीत करावे, तसेच वाचन करताना सुरुवात कशाप्रकारे करुन पुस्तकांशी मैत्री कशी याबाबत उपस्थित विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर लगेच सर्व उपस्थितांनी आपापल्या आवडीनुसार पुस्तके निवडून एक तास वाचन केले व आपले अनुभव कथन केले. वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तीमत्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याकरिता वाचन संकल्प महाराष्ट्राचाउपक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम १५ जानेवारीपर्यंत वाचन पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा इतर आयोजित करण्यात येणार आहेत.

वाचन संकल्प महाराष्ट्राचाउपक्रमाअंतर्गत शासकीय जिल्हा ग्रंथालयात दि. १ जानेवारी ते १५ जानेवारी, २०२५ पर्यंत विशेष वाचक सभासद नोंदणी मोहीम सुरु करण्यात येत आहे. हिंगोली जिल्हयातील सर्व ग्रंथप्रेमी, वाचकांनी मोठ्या प्रमाणात सभासद होऊन सहभाग नोंदवावा व वाचनाचा आनंद घ्यावा. याकरिता जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नेहरु नगर, रिसाला नाका, हिंगोली (सपर्क क्रमांक. ९४०३०६७२६७) येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. हे ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नेहरु नगर, रिसाला नाका, हिंगोली येथे येऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी केले आहे.

# वृध्दांना ऑटोत बसवून पैसे लुटणारी टोळी स्थागुशाने केली जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

हिंगोली शहरासह जिल्ह्यात वृध्द नागरिकांना ऑटोत बसवून पैसे लुटणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे. यामध्ये नांदेड येथील चौघांचा समावेश असून त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

मागील काही महिन्यांपासून वृध्द नागरिकांवर पाळत ठेवून त्यांना ऑटोमध्ये बसवून त्यांच्याकडील पैसे पळविणारी टोळी शहरात सक्रीय झाली होती. यापूर्वी हिंगोलीत एका व्यापाऱ्याचे ६८ हजार तर एका वृध्द नागरिकाचे २० हजार रूपये लुटण्याच्या घटना घडल्या होत्या. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते. या घटनांचा छडा लावण्यासाठी पोलिस विभागाने पथकाची स्थापना केली. पथकाने शहरातील १५ पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. यामध्ये काही जण ऑटोमध्ये बसून वृध्दांची वाट पाहून त्यांना ऑटोत बसवित असल्याचे दिसले. यावरून पोलिसांनी ऑटोचा शोध घेतला. यामध्ये पोलिसांनी सलमान उर्फ फेरोजखान पठाण, आकाश कुंटे, शेख नुसरत, गणेश गायकवाड सर्व रा नांदेड यांना ताब्यात घेतले. त्यांची पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्यांनी तीन गुन्ह्यांची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून ऑटो व रोख रक्कम असा एकूण २ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कामगिरी पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोनि विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, राजुसिंह ठाकूर, प्रेमदास चव्हाण, रवी स्वामी, खंडागळे, सावंत यांनी केली आहे.

# नववर्षानिमित्त शहरातील महापुरूषांच्या पूतळ्यांची स्वच्छता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

हिंगोली मित्र मंडळाच्या वतीने नववर्षाच्या निमित्ताने हिंगोली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी, संविधान चौक, महेश चौक, बसवेश्वर चौक, इंदिरा गांधी, अग्रेशन महाराज या महापुरुषांचे पुतळे नव वर्षाच्या निमित्ताने स्वच्छ धुऊन घेऊन महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून नववर्षाचे स्वागत हिंगोली मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले. महापुरुषांच्या विचाराने प्रेरित होऊन युवकांनी देशासाठी कार्य करत रहावे तसेच आपले जीवन यशस्वी करावे आणि जीवन जगावे. यावेळी शिवानंद होकर्णे, दिपक सेठी, डॉ.शुभम होकर्णे, यश होकर्णे, सचिन जवळेकर, राहुल उचाडे, सुनिल धुरिया, वैभव लोलगे, अजय होकर्णे, चेतन होकर्णे, योगेश होकर्णे, आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्तीबद्दल आनंद पतंगे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

जिल्हा परिषद बांधकाम विभागातील अभियंता आनंदराव पतंगे हे वयोमर्यादानुसार सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने जिल्हा परिषद येथील षटकोनी सभागृहात सेवानिवृत्ती निमित्त सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते आनंदराव पतंगे वसव पतंगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुमार कुंभार प्रकल्प संचालक नामदेवराव केंद्रे कार्यकारी अभियंता मुळे, बांधकाम संघटनेचे जिल्हाध्यक्ष रा.ना. कुलकर्णी, पजई यांच्यासह बांधकाम विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आनंद पतंगे यांनी जिल्हा परिषद अभियंता संघटनेचे जिल्हाध्यक्षपद सांभाळले.

# जिल्हा परिषद अभियंता संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी रा. ना. कुलकर्णी, सचिवपदी संदेश जाधव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

जिल्हा परिषदेच्या षटकोणी सभागृहात राज्य जिल्हा परिषद अभियंता संघटना जिल्हा शाखा हिंगोलीची दिनांक ३१.१२.२०२४ रोजी बैठक माजी जिल्हाध्यक्ष आनंद पतंगे यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी रा.ना.कुलकर्णी यांची बिनविरोध जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर सचिव पदी संदेश जाधव यांची निवड झाली आहे.



जिल्हा परिषद अभियंता संघटनेची इतर कार्यकारणी पुढीलप्रमाणे आहे. कोषाध्यक्ष शामकांत पजई, कार्याध्यक्ष वसंत वीर,सहसचिव दत्तात्रय मस्के, उपाध्यक्ष सोमेश्वर गीते, प्रमोद उबारे, बारी खान, संघटक सचिन कोकडवार, अक्षय गायकवाड, विकास लहाने, सल्लागार राजाराम चंदाले, महिला प्रतिनिधी रेखा सोनटक्के, निकिता पाटील तालुका अध्यक्ष हिंगोली संतोष बारहाटे, वसमत शत्रुघ्न आव्हाड, सेनगाव रवी तिखे, औंढा नागनाथ रामेश्वर बोरकर, कळमनुरी दासराव गिराम, यावेळी संघटनेचे राज्याध्यक्ष सुहास धारासुरकर, कार्यकारी अभियंता प्रदीप मुळे, आनंद पतंगे, शिवाजी पदमने, संजय सदावर्ते, संजय अग्रवाल, मारोती बोबडे, फुलतांबकर, नहारे, कोटपेट, लहाने, मार्कड, जटाले, सुरूशे, शेजुल, गंधारे सर्व शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक उपस्थित होते.

# सर्वसमावेशक नेतृत्व काळाच्या पडद्याआड, माजी आ. प्रदीप नाईक यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट/माहूर,दि. ०१ जानेवारी**

जलक्रांतीचे प्रणेते किनवट विधानसभेचे लोकप्रिय माजी आमदार प्रदीप नाईक यांचे १ जानेवारी रोजी पहाटे हैदराबाद येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले असून त्यांच्या निधनाची वार्ता पसरताच किनवट माहूर तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिव देहावर २ जानेवारी रोजी दहेलीतांडा या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाकडून किनवट विधानसभा मतदारसंघाचे सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केलेले लोकप्रिय माजी आमदार प्रदीप हेमसिंग नाईक यांचे १ जानेवारी २०२४ रोजी पहाटे पाच वाजताच्या सुमारास हैदराबाद येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.मृत्यू समयी ते ६९ वर्षाचे होते त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा दोन मुली जावई असा मोठा परिवार असून प्रदीप नाईक यांच्या निधनाची वार्ता वाऱ्यासारखी पसरल्यानंतर किनवट माहूर तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.दि.२ जानेवारी रोजी सकाळी ११ वा.दहेलीतांडा या मूळगावी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. दरम्यान प्रदीप नाईक यांच्या निधनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीच्या नेत्या सुप्रियाताई सुळे, अशोकराव चव्हाण यांच्यासह विविध पक्षाचे नेते सामाजिक संघटनांचे नेते पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शोकसंदेशाद्वारे श्रद्धांजली अर्पण केली.

सुरुवातीच्या काळात प्रदीप नाईक हे सधन व प्रगतशील शेतकरी तर होतेच परंतु आदिलाबाद येथे कापसाचे नामांकित व्यापारी म्हणुन प्रसिद्ध होते.१९९८ साली त्यांनी शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून राजकारणात पदार्पण केले.१९९९ च्या विधानसभा निवडणुकीत माझी महसूल मंत्री डी बी पाटील यांच्याशी त्यांनी अटीतटीची लढत दिली. या निवडणुकीत पराभव झाला असला तरी नव्या जोमाने त्यांनी पक्षाची संघटनात्मक बांधणी करून २००४ च्या विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय प्राप्त केला. सन २००४ ते २०१९ या कालावधीत त्यांनी आमदारकीची हॅट्रिक केली प्रदीप नाईक यांच्या काळात जिल्हा परिषद पंचायत समिती किनवट नगरपालिका माहूर नगरपंचायत व बाजार समितीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एकहाती वर्चस्व होते. कार्यकर्त्याला नेता बनविणारा कारखाना अशी ओळख त्यांनी निर्माण केली. किनवट माहूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासात प्रदीप नाईक यांचे मोलाचे योगदान राहिले असून उच्च पातळी बंधाऱ्याच्या माध्यमातून त्यांनी जलक्रांती आणून मागास दुर्गम भागातील शेतकऱ्यांना सुजलाम सुफलाम केले.सोज्वळ स्वभाव आणि सर्वसमावेशक नेतृत्वामुळे किनवट माहूर तालुक्यातील गोरगरीब सर्वसामान्य नागरिकाचे ते 'भाया' ठरले हे विशेष!

**प्रदीप नाईकांचे विकासातील योगदान विसरता येणार नाही : आ. केराम**

प्रदीप नाईक हे माझे राजकीय विरोधक असले तरी सच्चे मित्र होते किनवट माहूरच्या विकासातील त्यांचे योगदान विसरता येणार नाही प्रदीप नाईक यांचे अकाली निधन धक्कादायक आहे.किनवट माहूर तालुक्यातील तमाम जनतेच्या वतीने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अशा शब्दात आ. भिमराव केराम यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

**माजी आ.प्रदीप नाईक यांची पक्षनिष्ठा कायम स्मरणात राहील : आनंद मच्छेवार**

माजी आमदार प्रदीप नाईक यांचे निधन झाल्याचे कळाल्यानंतर अनामिक धक्का बसला. त्यांचे निधन क्लेशदायक आहे.प्रदीप नाईक हे किनवटच्या राजकारणातील सोज्वळ नेतृत्व होते मी नगराध्यक्ष असतानाच्या काळात ते आमदार होते. विकासात्मक कामात त्यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले.त्यांची राजकीय निष्ठा आणि विकासात्मक कार्य कायम स्मरणात राहील.

**आमदार म्हणून कृर्तृत्व आणि नेतृत्व प्रेरणादायी : रमेश बद्दीवार**

लोकनेते माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाचे वृत्त कळल्यानंतर अतिव दुःख झाले सलग तीन टर्म आमदार म्हणून त्यांचे कर्तृत्व आणि नेतृत्व प्रेरणादायी आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

**देव हरवला : समाधान जाधव**

माजी जिप.उपाध्यक्ष समाधान जाधव- माझा देव हरवला-साहेब! तुमच्या समाधानला एका क्षणात पोरकं करुन गेलात.

**मृत्यूचे वृत्त स्तब्ध करणारे : रामदास पाटील**

रामदास पाटील सुमठाणकर, हिंगोली- माझे मित्र,राजकारणातील शांत,निष्कपट, मृदुभाषी,व्यक्तिमत्व असनारे फार दुर्मिळ म्हणजे प्रदीप नाईक! त्यांच्या मृत्यूचे वृत्त स्तब्ध करणारे आहे.

**माझा नेता,लोकनेता हरपला! : फिरोज दोसानी**

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक महान नेतृत्व म्हणजे किनवट,माहूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार प्रदीप नाईक!कितीही संकटे आली, वादळे आली तरी आपली राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाशी असलेली निष्ठा अढळ राहिली.आपली ही निष्ठा आमच्यासाठी सदैव प्रेरणादायी आहे.माझ्या सार्वजनिक जीवनात अभ्यासू आणि सुसंस्कारी नेता म्हणून आपलं स्थान कायम निश्चित राहील.

## संक्षिप्त वृत्त

### पत्रकार पांचाळ यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर कर्मयोगी राष्ट्रीय पुरस्कार

**भोकर**-पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल भोकर येथील पत्रकार बी. आर. पांचाळ यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने दिला जाणारा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर कर्मयोगी राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला असून पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला ५जानेवारी२०२५ रोजी नाशिक येथे पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. पत्रकार बी.आर.पांचाळ यांनी ग्रामस्वच्छता अभियान आरोग्य आणि शिक्षण, शेतकरी व महिलांचे प्रश्न अशा अनेक विषयावर लिखाण करून सामाजिक बांधिलकी जोपासली त्यांच्या उत्कृष्ट लिखाणाची दखल घेऊन यापूर्वी त्यांना शासनाचे विविध संस्थांकडून पूरस्काराने सन्मानित करण्यात आले.नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा कर्मयोगी बाळशास्त्री जांभेकर राष्ट्रीय पुरस्कार त्यांना नुकताच घोषित झाला असून पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला५ जानेवारी २०२५ रोजी नाशिक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार आहे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी पत्र पाठवून पुरस्काराची घोषणा केली असून बी. आर पांचाळ यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केल्या जात आहे.



### नांदेड टॉवरची घड्याळासाठी वागदरीकर घेणार नगरविकास मंत्र्यांची भेट

**नांदेड**-शहराचे वैभव असलेल्या जुना मोंढा येथील टॉवरची घड्याळ अनेक दिवसांपासून बंद आहे ही घडी दुरुस्त करावी अशी मागणी पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह मनपा आयुक्तांकडे केली आहे. परंतु या मागणीची दखल घेण्यात न आल्याने पत्रकार किशोरकुमार वागदरीकर आता मुख्यमंत्र्यांसह नगर विकास मंत्र्यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे. नांदेड शहरातील जुना मोंढा परिसरात असलेले टॉवर हे शहराचे वैभव होते. शहर परिसराचे सुशोभीकरण होण्यापूर्वी हे टॉवर हातावर पोट असणाऱ्या हमाल मजुरांचे अश्रय स्थान होते. याच ठिकाणी ते घटकाभर विश्रांती घेत परंतु कालांतराने नांदेड शहरात तथा जुना मोंढा परिसराचा विकास झाला परंतु या विकासात मात्र नांदेडचे वैभव असलेल्या टॉवरची दुरावस्था झाली. टॉवरच्या चारही बाजूने मोठ-मोठ्या दगडांचा रस्ता बनवण्यात आला यामुळे पावसाळ्यात अनेक दुचाकीस्वार घसरून पडत असून काही चिरेबंद दगडे निघाली असून खड्डे झाली आहेत.त्यातच टॉवरची घडी मागील अनेक वर्षापासून बंद आहे ही घडी दुरुस्त करावी अशी मागणी पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांकडे देखील केली आहे. त्याबरोबरच समाज माध्यमांमध्ये देखील त्यांनी हा विषय पोटतिडकीडे ने मांडला आहे. परंतु या मागणीची दखल घेण्यात न आल्याने आता ते थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह नगर विकास मंत्र्यांची ता. ८ जानेवारी रोजी भेट घेणार असून टॉवरच्या घड्याळसह विविध शहरातील मूलभूत सुविधा,समस्या संदर्भाने निवेदन देणार असल्याची माहिती आहे. दरम्यान पत्रकार किशोर कुमार वागदरीकर हे शहरातील समस्या संदर्भात एवढी सहजता दाखवीत असल्याने विविध क्षेत्रातील मंडळी त्यांचे कौतुक करत असून त्यांच्या मागण्या पूर्ण होवो अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.



**घड्याळाचा घंटानाद पुन्हा ऐकू येईल-वागदरीकर**

नांदेड शहरातील जुना मोंढा परिसरातील घडी ही हमाल, मापाडी मजूरदारांची वेळ सांगणारी होती. या घडीच्या घंटा नादावरून हे मजूर कामाची सुरुवात तथा काम बंद करू करत होते. तर याच घडीच्या वेळेवरून अनेक जण आपली कामे करत असत त्यामुळे नांदेडचे वैभव असलेली ही घडी सुरू करण्यासाठी पाठपुरावा सुरू असून लवकरच घडीचा घंटा नांद पुन्हा नांदेडकरांना ऐकू येईल असा विश्वास पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी व्यक्त केला आहे.

### मंगळवारी होणार पेन्शन अदालत

**नांदेड**-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी जानेवारी महिन्याच्या मंगळवार ७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

## एक लोकप्रिय नेतृत्व हरपले: खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ जानेवारी**

किनवट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनामुळे जिल्ह्यातील एक लोकप्रिय नेतृत्व हरपल्याची भावना माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाची बातमी अतिशय दुःखद आहे. विधीमंडळात आम्ही सहकारी होतो. नांदेड जिल्ह्याच्या विकासासंदर्भात आम्ही एकत्र काम केले. ते नांदेड जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रातील एक जुनेजाणते व्यक्तीमत्व होते. निगर्वी व मितभाषी स्वभाव आणि लोकांची कामे करण्यासाठी असलेली तळमळ यातून त्यांचा मोठा चाहता वर्ग निर्माण झाला होता. त्यांचे अकस्मात निधन अतिशय धक्कादायक आहे, या शब्दांत खा. अशोक चव्हाण यांनी माजी आमदार प्रदीप नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## सहकारी मित्रानेच केला मित्राचा खून

### माळेगांव यात्रा म्हणजे खुन्नस मिटवण्याचे ठिकाण होते काय ?

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०१ जानेवारी**

तालुक्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र आसलेल्या खंडेरायाच्या माळेगांव यात्रेत मागील जुन्या वादाच्या कारणावरून नांदेड येथील एका तरुणाचा धारदार शस्त्राने खून केल्याची घटना नववर्षाच्या पूर्वसंध्येला घडली याप्रकरणी माळाकोळी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

यंदा माळेगांव यात्रा राष्ट्रीय दुखवट्यामुळे कांहीं कालावधीसाठी पुढे ढकलण्यात आल्यामुळे यात्रा यात्रेत येणाऱ्या हौवसे, गवसे, नवशांचा ओघ वाढला असुन, त्याच प्रमाणे परिसरात विविध गुन्ह्याच्या घटना घडत आल्याचे दिसून येत आहे. यात्रेच्या पहिल्याच दिवशी अनेकांच्या खिशातील पॉकेट, रोकड, मोबाईल, महिलांच्या गळ्यातील पोत, पुरुषांच्या गळ्यातील चैन चोरट्यांकडून लंपास झाल्या होत्या. खुनाचे प्रकार देखील वाढले असल्याचे सदरील घटनेवरून पुढे आले आहे. मावळत्या वर्षाअखेर व नव वर्षारंभ च्या पूर्व संध्येला नांदेड येथील पाच तरुण माळेगांव यात्रेत मौज करण्यासाठी आले होते. त्यानंतर त्यांच्यात जुन्या वादाच्या कारणावरून शाब्दिक चकमक झाली त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. त्यात मनोज मिलिंद गर्जे (वय १९) याचा धारदार शस्त्राने खून करण्यात आला. याप्रकरणी मयताचे वडील मिलिंद गणपती गर्जे यांनी दिलेल्या तक्रारीवरून माळाकोळी पोलिस ठाण्यात सहकारी मित्र असलेले आरोपी परमेश्वर उर्फ बबलू नारायण जोंधळे, हर्ष राजू हणमंते, रोहित उर्फ चिंटू दिलीप धोत्रे व यश रायबोले यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास लोहा पोलिस ठण्याचे सपोनि रामचंद्र केदार करत आहेत. तळ्याच्या या काठावरुन त्या काठापर्यंत पोहत जाने हि शर्यती मारुन तळ्यात उतरला पण त्याचा शोध लागला नाही,सटवाईच्या तळ्या तीन लहान मुले उतरली पण लवकर बाहेर काढल्याने त्या चिमुकल्याचा जिव वाचला. अनेक घटना घडत आहेत तगडा बंदोबस्त असुन सुध्दा घटनेला आळा घातला जात नाही.

## वंचितांच्या हितासाठी तळपणारे नेतृत्व हरपले : आ चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ जानेवारी**

किनवट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, आमचे स्नेही मित्र प्रदीप नाईक यांच्या निधनाची वार्ता समजताच धक्का बसला. किनवट सारख्या दुर्गम भागात आदिवासी, दलित, शोषित, पीडित, मागास समाजाच्या विकासासाठी गेली २५ वर्षे ते परिश्रम घेत होते. सलग तीन वेळा किनवट विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणूनही त्यांनी नेतृत्व केले आहे. निवडणुका संपल्यानंतर पक्षीय राजकारणाला बाजूला ठेवून सामाजिक विकासाचा प्रश्न घेऊन ते सातत्याने लढत राहिले.

अत्यंत संयमी आणि मितभाषी राहिलेल्या माजी आमदार प्रदीप नाईक यांनी खऱ्या अर्थाने किनवट तालुक्याच्या विकासाची पायाभरणी केली. या भागात विकासाची गंगा आणली. त्यांच्या रूपाने आदिवासी समाजाचा वाडी तांड्यावरील शोषित पिढीत वंचितांचा चेहरा काळाच्या पडद्याआड गेला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो अशी शोक भावना आ. चिखलीकर यांनी व्यक्त केली आहे.

## मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना खत उपलब्ध करून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०१ जानेवारी**

मुदखेड तालुका हा ओलीताचा तालुका असुन यादिवसामध्ये याभागात ऊस, भोईमुग, हरभरा, गहु पिकाची मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी लागवड केली आहे. सदरील पिकास लगणारा खत पुरवठा हा कमी असल्याने किंवा जाणुन बुजुन साठा ठेवुन खतविक्रि करीत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतक-यांना अडचण निर्माण होत आहे. संबंधीत अधिकारी यांनी मार्केट मधील खताचा साठा किती आहे याची पडताळणी करुन शेतक-यांना लागणारा खत पुरवठा उपलब्ध करुन शेतक-यांना दिलासा द्यावा. ज्या कृषी सेवाकेंद्राने खत साठवणुक केली आहे. त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. कारण शेतक-यांना मागील पंधरा दिवसापासुन खत पुरवठा सुरळीत होत नाही. असे चालु राहिले तर युवासेना शिवसेना, स्टाईलने अंदोलन करण्यात येईल असा ईशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. युवा सेना तालुका प्रमुख शिवाजी पाटील गाढे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख पिंटू पाटील वासरीकर, युवा सेना तालुका प्रमुख शिवाजी पाटील गाढे, दिपक देशमुख, शाम पाटील शिंदे, प्रसाद जाधव, केशव पाटील शिंदे, ज्ञानेश्वर पाटील शिंदे, किशन राठोड, महेश पाटील,यासह आदि युवा सैनिक शिवसैनिक उपस्थित होते.



**तालुका कृषी अधिकारी यांनी योग्य ती चौकशी करुन खताचा साठा तालुक्यात उपलब्ध करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी व तालुक्यातील शेतकऱ्यांना पिकांसाठी खत उपलब्ध करून देण्यात यावे.**

## लोकनाट्य तमाशा कलावंतांच्या समस्या 'शासन स्तरावर'प्रश्न माडू- आ चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०१ जानेवारी**

माळेगाव यात्रेत अनेक वर्षा पासून लोकनाट्य तमाशा फड येतात बदलत्या काळात तमाशा पाहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस घटते आहे. पण महाराष्ट्राची लोकधार असलेल्यरं या पारंपरिक कलेची जोपाण्याची करण्याची गरज असून कलावंताच्या समस्या त्याच्या अडीअडचणी शासन दरबारी मांडू असे जिल्ह्याचे नेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी तमाशा फड मालकांना आश्वासित केले



आ. प्रतापराव पाटील चिखलीकर स्वतः यात्रेत फेरफटका मारला यंदाही यात्रेतील अश्व मालक , तसेच छोटे मोठे व्यापारी याचे म्हणणे तसेच त्याच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्याची सोडवणूक केली प्रशासनाला सूचना केल्या लोकनाट्य तमाशा हे माळेगाव यात्रेचे एक खास वैशिष्ट्य मानले जाते

यंदा यात्रेत . रघुवीर खेडकर , मंगला बनसोडे, पांडुरंग मुळे मांजरवाडीकर, आनंद लोकनाट्य मंडळ, हरिभाऊ बडे हे पाच लोकनाट्य आले आहेत.जिल्ह्याचे नेते व या भागाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या पाचही तंबू जाऊन फड मालकांच्या भेटी घेतल्या राज्याच्या वेगवेगळ्या भागात तमाशाचे प्रयोग हे विजयादशमी ते वैशाखी पूर्णिमा या काळात चालतात. पण सोशल मीडियाच्या काळात रसिकांची अभिरुची बदलली .त्यामुळे ३७ लोकनाट्य पैकी केवळ सात लोकनाट्य तमाशा आता शिल्लक राहिले आहेत.ही कला आता शेवटची घटिका मोजत आहे.अशी पोटतिडक फड मालक बोलून दाखवत होते .तमाशा तंबूत जवळपास शंभर -सव्वाशे कलाकार -,कामगार असतात त्यातुलनेत प्रेक्षक वर्ग वग ' पाहण्यासाठी येत नाहीत शिवाय वेळेचे बंधन आहे पूर्वी पहाटे पाच वाजेपर्यंत प्रयोग (खेळ) चालत असे आता तसे होत नाही. असा अडचणी उपरोक्त पाचही फडफड मालकांनी कलावंतांना प्रतापरावांच्या समोर मांडल्या. तमाशा कलावंताना मानधन, दयावे तसेच राज्यात सर्व ठिकाणी आमच्या वाहनांना टोल माफी,असावीकोरोना काळात जे पॅकेज दिले होते त्याच धर्तीवर शासनाने मदत शासन द्यावी तमाशा व त्याची कला जोपासण्यासाठी प्रयत्न व्हावेत असा मागण्या कलावंतांनी केल्या पण माळेगाव यात्रेत आम्हा तमाशा कलावंतांना जेवढी सुरक्षा मिळते तेवढी राज्यात कुठेही मिळत नाही अन्यत्र .खूप त्रास होतो आपल्या मुळे येथे पोलीस संरक्षण मिळते याची आम्हाला जाणीव आहे असा भावना तमाशा फड मालकांनी बोलून दाखवल्या. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पाचही फड मालकांच्या समस्या अडीअडचणी त्याचे म्हणणे ऐकून घेतल्या.

## सिडको येथे भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त शूरवीरांना मानवंदना

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०१ जानेवारी**

भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त सिडको हडको परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क यासह सर्व बौद्ध विहारात भीमा कोरेगाव येथे झालेल्या घटनेत शहीद शूरवीर भीमसैनिकांना मानवंदना देण्यात आली.



सिडकोयेथेमध्यवर्ती उद्यान येथे नव्याने उदयास आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको नवीन नांदेड येथे भिमा कोरेगाव शौर्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी भीमा कोरेगाव येथे घडलेल्या घटनेत शहीद झालेल्या शूरवीरांना मानवंदना देण्यात आली तसेच सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शौर्याचे प्रतीक असलेल्या विजयस्तभ भीमा कोरेगाव यांच्या प्रतिकृती स्तंभास परिसरातील शेकडो भीमसैनिकांनी मानवंदना देऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाच्या वतीने ही मानवंदना सिडको परिसरातील शेकडो भीमसैनिकाच्या उपस्थितीत देण्यात आली. तसेच सिडको परिसरातील प्रत्येक बुद्ध विहारात भीमा कोरेगाव येथील शहीद शूरवीरांना मानवंदना देण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे सहा महिन्यापासून परिश्रम घेत असलेले सर्व समाज बांधव (भीमसैनिक) यांच्यासह सिडको हडको परिसरातील शेकडो भीमसैनिक व महिला भगिनीची उपस्थित होती.

## निवघा बाजार परिसरातून हजारो ब्रास रेतीचा अवैध उपसा

**तभा वृत्तसेवा**
**निवघा बाजार,दि. ०१ जानेवारी**

ग्रामीण भागात दुर्गम भागात चालू असलेल्या विकास . कामांना व घरबांधणी करीता धानोरा .बोरगाव, हस्तर मारले गांव येथील उपनदीच्या ठेक्यातून दररोज दिवस रात्र पधरा ते वीस ट्रॅक्टरच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळू उपसा करून रेती गौण खनिजापासून शासनाने मिळणारा लाखो रुपयाचा महसूल लालची वृत्ती असलेल्या अधिकाऱ्यांच्या लालसे पोटी पाण्यात जात आहे. रेती माफियांकडून अव्वाच्या सव्वा भावामध्ये बांधकाम धारक नागरिकांना आपली गरज भागवण्यासाठी रेती घ्यावी लागत आहे.

या बाबीमुळे गरजवंत नागरिकांची आर्थिक पिळवणूक केल्या जात आहे. तेव्हा जिल्हा प्रशासनाने या बाबीकडे लक्ष देऊन संबंधित महसूल विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करावी व या भागात चालत असलेला अवैध रेती उपसा थांबवावा, अशी मागणी होत आहे. अव्वाच्या सव्वा किमतीमध्ये गरजू बांधकाम धारकांना विक्री करून अवैध वाळू उपसा करणारे माफीया आपली पोळी भाजून घेत आहेत.

निवघा बाजार परिसरातून उपनद्यांमधून दिवस-रात्र परिसरातील पंधरा ते वीस खासगी ट्रॅक्टर, जेसीबीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा करून ग्रामीण भागात विक्री करीत आहेत. ही बाब संबंधित सज्जातील तलाठी मंडळ अधिकारी यांना माहीत असूनही हप्ते घेऊन गप्प बसत आहेत अवैध विनापरवाना रेतीमाफीयाकडे नजर अंदाज करित आहेत. महसूल विभागाने आजपर्यंत या भागातून कठोर दंडात्मक कारवाई एकाही वाळूमाफियावर केली नसल्याने नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा होत आहेत.

**महसूल विभागाच्या दुर्लक्षपणामुळे शासनाचा महसूल पाण्यात**



## पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष पांडागळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ जानेवारी**

मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी विद्यमान कार्याध्यक्ष, दैनिक सत्यप्रभाचे कार्यकारी संपादक संतोष पांडागळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. .मराठी पत्रकार परिषदेने एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे बिनविरोध निवडीची घोषणा केली आहे.

दैनिक सत्यप्रभाचे कार्यकारी संपादक संतोष पांडागळे नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते. गेल्या जिल्हा मराठी पत्रकार संघ कार्यकारिणीची मुदत संपल्यानंतर नूतन अध्यक्ष निवडीसाठी परिषदेचे निरिक्षक, सरचिटणीसप्रा.सुरेश नाईकवाडे यांनी दोन वेळा नांदेडला भेट देऊन सर्व वरिष्ठ पदाधिकारी तसेच सदस्यांशी चर्चा केली आहे.वार्ताहर ते कार्यकारी संपादक असा पत्रकारितेतील प्रवास असलेल्या संतोष पांडागळे यांची नियुक्ती .मराठी पत्रकार परिषदेने केली आहे. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेऊन परिषदेशी विचारविनिमय करून आपली कार्यकारिणी तयार करावी अशा सूचना करण्यात आल्या आहेत. मावळते अध्यक्ष गोवर्धन बियाणी आणि त्यांच्या टीमने आपल्या कार्यकाळात नांदेड जिल्हयात उल्लेखनीय कार्य करून परिषदेची चळवळ गतीमान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता संतोष पांडागळे टीमनेही परिषेदेच्या चळवळीला आणखी स्पीड देत ग्रामीण वार्ताहर ,पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## सावळदबारा वन हद्दीमध्ये अवैध रितीने सागवान वृक्षांची तोड करणाऱ्यांवर वन विभागाची कारवाई



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ जानेवारी : अजिंठा वन परीक्षेत्र सावळदबारा वन परिमंडळ हद्दीमध्ये राखीव वन विभागाच्या हद्दीत भर दिवसा सर्रास पणे सागवान जातीच्या वृक्षांची कत्तल सुरु असल्याची माहिती वन विभागाला मिळाली असता सावळदबारा वन परिमंडळ चे वनपाल टी.झेड.खतीब सावळदबारा बिट चे वनरक्षक सुनील खर्डे,टिटवी बिट चे वनरक्षक बबन राठोड यांनी सावळदबारा राखीव वन हद्दीमध्ये सापळा रचून सागवान झाडे तोडत असताना दोन युवकांना मुद्देमाला सहित ताब्यात घेतले व या सागवान वृक्षांची अवैध तोड करणाऱ्यांना ताब्यात घेऊन मुद्दे माल जप्त करून अजिंठा वन परीक्षेत्र अधिकारी संतोष आर.दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली अजिंठा वन परीक्षेत्र कार्यालय येथे भारतीय वन कायदा अधिनियम १९२७ च्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अवैध सागवान वृक्षतोड करणारे निवृत्ती नारायण अनासुने राहणार सावळदबारा व दिपक गजानन गुंजे राहणार सावळदबारा यांना अवैध रीतीने सागवान वृक्षांची कत्तल करताना सावळदबारा राखीव वन हद्दीमध्ये कुंडवाला खोऱ्या समोर जायमोक्यावरती घटनास्थळी पकडून त्यांच्या ताब्यातून सागवान वृक्षांची लाकडे जप्त करून निवृत्ती अनासूने, व दिपक गुंजे यांना ताब्यात घेऊन अजिंठा वन परीक्षेत्र कार्यालय येथे वन कायदा अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती अजिंठा वनपरीक्षेत्र कार्यालय येथून प्राप्त झाली आहे. यात अवैध रित्यांनी वृक्षतोड करणारे आणखीन कुणी सहभागी आहेत का या संदर्भामध्ये अजिंठा वनपरीक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सावळदबारा वन परिमंडळ चे वनपाल टी.झेड. खतीब हे करीत आहे वनपाल खतीब यांच्या तर्फे सर्वांना असे आवाहन करण्यात आले आहे सावळदबारा वन परिमंडळ राखीव वन हद्दीमध्ये कुणी हीअवैध वृक्ष तोड करूनये असे कृत्ये करणाऱ्यांची गय केली जाणार नाही असे कृत्ये केल्यास भारतीय वन कायदा अधिनियम १९२७ च्या कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात येईल आणि योग्यती कारवाई केली जाईल असे सांगण्यात आले.

## जिल्हास्तरीय 'चाचा नेहरू बाल महोत्सव'आज पासून

छत्रपती संभाजीनगर, दि.१ :- जिल्हा महिला व बालविकास कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन गुरुवार दि.२ ते शनिवार ४ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. निरीक्षणगृह/ बालगृह, हडको कॉर्नर ,छत्रपती संभाजीनगर येथे हा बाल महोत्सव सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. शासकीय आणि स्वयंसेवी बालगृहातील बालकांच्या कला व सूप्त गुणांना वाव मिळाव्वा यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. महोत्सवाचे उद्धाटनास जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त प्रवीण पवार हे उपस्थित राहणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थी, नागरिकांनी उपस्थित राहून मुलांना प्रोत्साहन घ्यावे असे आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी श्रीमती रेशमा चीमंद्रे यांनी केले आहे.

## फारोळा येथील सारा शौर्य पार्क प्लॉटिंग विनापरवानगी विक्री सूरु



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १ जानेवारी : पैठण तालुक्यातील फारोळा येथील गट क्रमांक ५३ मधे मागिल काही महिन्यापासून सारा शौर्य पार्क नावाने फारोळा येथे अनधिकृतपणे प्लॉटिंग विक्रीचा व्यवहार करून अनेकांची फसवणूक केली जात असल्याची चर्चा फारोळा परिसरात सुरू असून सविस्तर माहिती अशी की, ग्रामपंचायत कार्यालय फारोळा हद्दीतील गट नंबर ५३ मधे सारा शौर्य पार्क नावाने प्लॉट पाडून त्याची बिनधास्तपणे विक्री करीत असून या संदर्भात आमचे प्रतिनिधी यांनी ग्रामपंचायत कार्यालय सरपंच व ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या प्लॉटिंग विषयी आमच्याकडे कुठलाही रीतशिर परवाना खरेदी विक्रीचा प्लॉटिंग धारकाने घेतलेला नसुन ग्रामपंचायत कार्यालय फारोळा लवकरच या अनधिकृत प्लॉट विक्री करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. या प्लॉट धारकावर काय कारवाई होणार हे बघणे लक्षणे आहे.

### कारवाई करण्यात येईल

गट क्रमांक ५३ मधील सारा शौर्य पार्क या प्लॉटिंगला कुठलीही रितशीर परवानगी फारोळा ग्रामपंचायत कार्यालय दिलेली नसुन ग्रामपंचायत अधिनियमाप्रमाने कारवाई करण्यात येईल.

– आशा तुपे, ग्रामसेविका फारोळा

आमच्या फारोळा ग्रामपंचायत हद्दीतील अशा अनधिकृत खरेदी विक्री होत असलेल्या प्लॉटिंगवर नियमानुसार व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच प्लॉट खरेदी करणाऱ्यांनी अगोदर सर्व परवानगी आसलेली व खात्री करूनच व्यवहार करावा आम्ही सारा शौर्य पार्कला कुठलीही परवानगी दिलेली नाही

– सलीम पठाण, सरपंच ग्रामपंचायत कार्यालय फारोळा

## वडवाळी येथे दिवसाढवळ्या धाडसी चोरी, चोरटे सीसीटीव्हीत कैद

तभा वृत्तसेवा


पैठण दि ०१ : पैठण तालुक्यातील वडवाळी येथे मंगळवार दिनांक ३१ डिसेंबर रोजी दिवसा ढवळ्या चोरी झाली असून लाखो रुपयांचे दाग दागिने आणि रोकड चोरट्यांनी लंपास केली आहे. वडवाळी येथील प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार शिवाजीराव गाडे यांच्या घरी तीन चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला.

श गाडे हे कळसुबाई शिखर भटकंतीसह साठी आपल्या तिन्ही मुलांना सोबत घेऊन गेले असताना व त्यांच्या पत्नी शेतात गेल्याची संधी साधून चोरट्यांनी



दुपारी ३.१८ वाजता घरात प्रवेश करून धुडगूस घातला. घरामधील कपाटाचे दोन्ही लॉकर तोडून व देव देव्हाऱ्यात ठेवलेले झुंबर जोड ९ ग्रॅम, इयरिंग साडेतीन ग्रॅम, कानातील वेल साडेतीन ग्रॅम, मनी मंगळसूत्र पाच ग्रॅम, गळ्यातील पोत अडीच ग्रॅम असा साडे तेवीस ग्रॅम सोन्याचे दाग दागिने व नगदी ८००० व टॅब चोरीला गेल्याची तक्रार शिवाजी गाडे यांच्या पत्नी संगीता गाडे यांनी पैठण पोलीस ठाण्यात दिली आहे. घरात चोर शिरल्याची माहिती आजूबाजूच्या महिलांना मिळताच त्यांनी संगीता गाडे यांना फोन करून कल्पना दिली असता सदर चोरट्यांनी आम्ही त्यांचे मित्र आहोत अशी थाप मारून युनिकॉर्न मोटरसायकल वर बसून पोबारा केला. दिवसा ढवळ्या वडवाळी गावात जबरी चोरी झाल्याने एकच खळबळ उडाली असून घडलेली घटना समजताच पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. गावात आजूबाजूला असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये पोलिसांनी तपासणी केली असता सदरील तीन चोरटे कॅमेरा मध्ये कैद झालेले दिसून आले आहे.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक
डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार
जन्म १ एप्रिल १८८९ मृत्यू २१ जून १९४०

आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्व प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण. या अर्थाने मी अलक लिहिले आहे

अलक (१)

### वारस

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व सरसंघचालक आहेत परमपूजनीय डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार. ही हिंदुत्ववादी संघटना आहे. डॉक्टर हेडगेवार म्हणजे उदंड कीर्ती चे एक समर्पित जीवन. यांच्याप्रमाणेच यांच्यानंतरचे सारेच वारस समर्पित जीवनाच्या आदर्शाचे सन्माननीय-आदरणीय व्यक्तिमत्वाचे मानकरी. या सर्वांना सादर प्रणाम. आत्ता मी त्यांची आठवण करून देते.

सरसंघचालक

१) श्री. केशव बळीराम हेडगेवार (१९२५ ते १९३०; १९३१ ते १९४०)
२) श्री. लक्ष्मण वामन परांजपे (१९३० ते १९३१)
३) श्री. माधव सदाशिव गोळवलकर (१९४० ते १९७३)
४) श्री. मधुकर दत्तात्रय देवरस (१९७३ ते १९९३)
५) श्री. राजेंद्र सिंग (१९९३ ते २०००)
६) श्री. के एस सुदर्शन (२००० ते २००९)
७) श्री. मोहन मधुकर भागवत २२/६/२००९ ते विद्यमान

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## सोयगाव येथून शेगावकडे पायी दिंडीचे प्रस्थान



सोयगाव,दि.१ जानेवारी : सोयगाव परिसरातील गजानन महाराज मंदिर येथून पायी दिंडी सोहळा दि.१ जानेवारी सकाळी ९:३० वाजता संत श्री गजानन महाराज शेगांव मंदिर कडे रवाना झाली आहे.या दिंडीचे अध्यक्ष कुसुमताई वाडेकर यांच्या प्रेरणेतून आणि गजानन भक्त परिवार सोयगाव, आमखेडा, जंरडी, शैदुर्णी, माळेगाव पिप्री,मेणगाव,आदिंसह गावातील गजानन भक्त परिवार यांनी पार्यी दिंडीमध्ये सहभागी झाले आहेत.

### एमजीएममध्ये 'अनुबंध २०२४' यशस्वीपणे संपन्न

## 'अनुबंध २०२४' जगभरातील माजी विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि.१ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या अंतर्गत विविध महाविद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांचा 'अनुबंध २०२४' मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यामध्ये जगभरातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे आपला सहभाग नोंदविला होता. हा मेळावा विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांमध्ये स्वतंत्रपणे आयोजित करण्यात आला होता तर जेएनईसीचा 'अनुबंध २०२४' हा मेळावा रुक्मिणी सभागृहात संपन्न झाला.



रुक्मिणी सभागृहात झालेल्या कार्यक्रमास कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, एन्ड्रेस अँड हाऊसरचे व्यवस्थापकीय संचालक कैलास देसाई, अधिष्ठाता डॉ.एच.एच. शिंदे, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, माजी विद्यार्थी मेळाव्याच्या समन्वयक डॉ.परमिंदर कौर, माजी विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, आपण जगभरातील विविध ठिकाणांहून आपण आज या माजी विद्यार्थी मेळाव्यात आलात, आपल्या सर्वांचे आज स्वागत करीत असताना आनंद होत आहे. आपण ज्या संस्थेत घडलो ती संस्था पाहण्यास आपण पुन्हा एकदा परत आलात हे आपल्या सर्वांचे मोठेपण आहे. १९८३ पासूनच्या सर्व बॅचच्या विद्यार्थ्यांशी आम्ही जोडलेलो आहोत. आपले विद्यार्थी आपल्या क्षेत्रात जेंव्हा मोठी कामगिरी करतात तेंव्हा संस्थेस खूप चांगले वाटते.

एमजीएम विद्यापीठाने सध्या विद्यार्थ्यांना सामोर ठेऊन अनेक नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत. आपण सर्व विद्यार्थी कायम एकमेकांशी जोडलेले राहावे यासाठी आपण एक डिजिटल डायरी बनवत आहोत. आपण सगळे विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात यशस्वी असून आपण विद्यापीठात येऊन विद्यार्थ्यांना शिकविण्याचे आणि मार्गदर्शन करण्याचे काम करावे, असे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी बोलताना उद्योजक कैलास देसाई म्हणाले, आज प्राचार्य प्रतापराव बोराडे सरांची आठवण येते. त्यांच्यासारखे शिक्षक आम्हाला मिळाले म्हणून आम्ही घडू शकलो. एन्ड्रेस अँड हाऊसर या स्विस कंपनीच्या माध्यमातून मी काम करीत आहे. आज सर्व जुन्या मित्रांना या निमित्ताने भेटत असताना मनस्वी आनंद होत आहे. 'अनुबंध २०२४' मध्ये ३३३ शहरांमधून २५६२ माजी विद्यार्थ्यांनी आपला सहभाग घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी मेळाव्याच्या समन्वयक डॉ.परमिंदर कौर यांनी केले. या कार्यक्रमात काही माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सरफराज अली, प्रा. दीपा देशपांडे, प्रा. गिरीश बसोले यांनी केले.

## विद्यार्थी व पालकांच्या तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धा उत्साहात

वाळूज महानगर ( प्रतिनिधी) : मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मिना यांच्या संकल्पनेतून व शिक्षणाधिकारी (प्रा.) जयश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व पालक यांच्या तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धेचे उद्धाटन करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व पालक यांच्या तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धेचे राजे संभाजी भोसले सैनिक स्कुल कांचनवाडी येथे अतिरीक्त मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ सुनिल भोकरे, गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके व गटशिक्षणाधिकारी दिपाली थावरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन होऊन मोठया उत्साह मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कबड्डी,खो-खो, व्हॉलीबॉल, संगीत खुर्ची, थाळी फेक, गोळा फेक, रस्सी खेच या सारख्या अनेक स्पर्धा विद्यार्थी, पालक यांच्या संपन्न झाल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासा सोबत खेळणे ही आवश्यक आहे आणि त्यांची खेळात रुची



वाढावी आणि मुलांनी आपल्याला आवडेल त्याच क्षेत्रात आपले करियर करावे असे सूचक मार्गदर्शन डॉ सुनील भोकरे यांनी करून या कार्यक्रमाची सुरवात करून दिली. या स्पर्धा यशस्वीतेसाठी शिक्षण विस्तार अधिकारी मनीषा वाशिंबे, कल्पना पदकोंडे, धनराज कांबळे,सर्व पंच,केंद्र प्रमुख शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

## बाळापूर येथून एक व्यक्ती हरवला



तभा वृत्तसेवा

अजिंठा दि १ जानेवारी : बाळापूर येथून एक व्यक्ती हरवला असल्याचे समोर आले आहे. त्याच्या परिवाराकडून सर्वत्र शोध घेतला जात आहे. अजून पर्यंत मिळून आले नाही. मिळालेल्या माहितीनुसार सिल्लोड तालुक्यातील बाळापूर गावातील राहणारे ४४ वर्षीय भास्कर दामु अपार हे हरवले असल्याची तक्रार अजिंठा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

भास्कर अपार यांचा मुलगा कृष्णा भास्कर अपार याने १४ डिसेंबर २०२४ रोजी त्याचे वडील हे घरातून त्यांना काही एक न सांगता कोठेतरी निघून गेले त्यांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. हरवला असल्याची तक्रार दि. २१ डिसेबर २०२४ शनिवार रोजी अजिंठा पोलीस ठाण्यात दिली आहे. भास्कर दामु अपार यांचे वय- ४४ वर्षे, व्यवसाय शेती रा. बाळपूर (ता. सिल्लोड) शिक्षण १० वी पास , रंग- सावळा, उंची ५ फूट , अंगात पांढरा शर्ट, काळी पॅन्ट, पायात काळ्या रंगाचे बूट भाषा मराठी व हिंदी येत आहेत हे कुठेही दिसले किंवा त्यांच्याबद्दल कोणतीही माहिती मिळाल्यास अजिंठा पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष पाईकराव मो न. ९९२३३४४६९१ आणि पोहे कॉ दिलीप तडवी मो न. ८९८३५३९२९४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आव्हान पोलीस उपनिरीक्षक धमदीप काकडे यांनी केले आहे .

## प्रभू श्री रामाच्या अश्रूंनी भिजलेल्या मातीच्या शिळे वरील तपश्चर्या

### श्री क्षेत्र भामाठाण येथील लिंबाखाली राम-लक्ष्मण भेट

तभा वूतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : महाराष्ट्र ही देवीदेवता, साधुसंत व शूरविरांची भूमी. मुळा नदी, प्रवरा नदी व गोदावरी या नद्या अहिल्यानगर जिल्ह्याला निसर्गाने दिलेले अनमोल वरदान आहे. श्रीरामपूर तालुक्यातील भामानगर (भौमाठाण) हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले गाव, याच भामानगर शिवारात, श्रीरामाच्या अश्रुंची पवित्र शिळा आहे.

त्रेतायुगात महाराष्ट्राचा बराचसा भूभाग जंगलमय असल्याने त्यास दण्डकारण्य म्हणायचे. गोदावरी नदीच्या तिरावरील जंगलात ऋषीमुनींचे वास्तव्य होते. त्या काळात लंकाधीश रावणाने या दण्डक अरण्यात घुसखोरी केली. त्याच्या दैत्यांनी ऋषीमुनींवर खूप अत्याचार केले. त्यावेळी श्रीराम, लक्ष्मण व सीतासहित चौदा वर्षे वनवासात होते. नासिकमध्ये पंचवटीत पर्णकुटी बांधून राहत असताना त्यांनी, खर आणि दुषण राक्षसासहित, दैत्यांचा वध करून त्यांच्या अत्याचारातून ऋषीमुनींना मुक्त केले. रावणाची बहिण शुर्पनखेला श्रीलंकेत पिटाळले. हे जेव्हा रावणास कळले तेव्हा त्याने राम लक्ष्मणाला मारण्याची व सितेचे हरण करण्याची कुटील योजना केली. गोदावरी नदीच्या काठावर त्याने पांच गुप्त सैनिकी छावण्या केल्या. मारीच दैत्य मायावी सुवर्णमृग बनून. श्रीरामाच्या पर्णकुटी समोर आला. या सुवर्णमृगाच्या कातड्याची चोळी (कंचुकी) मला हवी अशी इच्छा सितेने व्यक्त करताच. श्रीराम त्या सुवर्ण मृगाला धरण्यासाठी धावले. लक्ष्मण सितेचे संरक्षण करण्यासाठी पंचवटीला थांबले. तो सुवर्णमृग, गोदावरी नदीच्या काठाने धावतांना, रावणाच्या गुप्त सैनिकांनी रामावर हल्ला केला. रामाने पाचही छावण्यातील सैनिकांसी युध्द केले. काही युध्दात मारले गेले, जे वाचले ते पळून गेले.

प्रवरा संगमाजवळ श्रीरामाने त्या सुवर्ण मृगाला मारले ते गाव कायगावटोका या नावाने आजही प्रसिध्द आहे. तो मृग खाली पडताच त्याने आक्राळ-



विक्राळ रूप प्रगट केले. त्या मारीच राक्षसाने मरताना, हे रावणाचे कुटील कारस्थान असल्याचे सांगितले. लक्ष्मणाला मारून रावणाने सितेला पळवून नेले असेल. असे सांगताच राम पंचवटीकडे निघाले. वाटेत ते याच भामाठाण शिवारात एका निंबाच्या झाडाखाली थांबले. काही वेळाने लक्ष्मण तिथे आले. रामलक्ष्मणाची भेट याच ठिकाणी झाली. लक्ष्मणाला पाहून रामाची खात्री झाली की, त्या मायावी रावणाने सितेचे हरण केले असेल. जी सिता माझ्यासाठी सर्व राजवैभवाचा त्याग करून, वनवासात आली. तिने पत्नी धर्म पाळला, परंतु मी धर्नुधारी राम पती धर्म पाळू शकलो नाही. राम या ठिकाणी रडले. त्याच्या अश्रूंनी इथली माती भिजली. त्यांच्या अश्रूंनी भिजलेल्या मातीची शिळा झाली. तेच हे भामाठाण पवित्र ठिकाण आहे. कलियुगात याच शिळेवर, गोरक्षशिष्य, माणिक शेतकऱ्याने बारा वर्षे तपसाधना केली. तेच माणिक, अडभंगनाथ या नावाने प्रसिध्द झाले. याचा उलगडा सद्गुरू नारायणगिरी महाराजांनी केला. श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान मठधीपती स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज यांनी पुढील काळात या देवस्थाना च्या विकासात्मक कामा चा दृष्टिकोन ठेवून या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी सुख सुविधा भाविकाच्या मदतीने निर्माण करण्यासाठी प्रामाणिक पणाने जोमाने आपले कार्य आपले गुरुवर्य सद्गुरू, नारायणगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने पुढे चालू ठेवले त्यात प्रामुख्याने वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम बाल संस्कार शिबिर व विविध कार्यक्रम अडबंगनाथ संस्थान येथे संपन्न होतात अशी माहिती स्वामी अरुणा गिरीजी महाराज यांनी दिली.